May 1993

"The tribal begins to speak"

Adv. Madhav Bandu More

Sugawa publication
pune

# आदिवासी बोलू लागला

ॲड. माधव बंडू मोरे

सुगावा प्रकाशन

किमत १० रुपये

# मनोगत

पिढ्या न् पिढ्या निरनिराळ्या प्रकारच्या शोषणाचा बळी ठरलेल्या या समाजाला आपले अस्तित्व टिकवण्याच्या नादात आपली अस्मिता, ओळख यांचा विसर पडला. स्वतःला सुसंस्कृत समजणाऱ्या समूहाने कोणत्याही प्रकारे उल्लेख केला, जुलूम, अत्याचार केले तरी त्याविरुद्ध तक्रार करणेसुद्धा गुन्हा ठरावा, अशा वातावरणात हा समाज जगत होता. त्याला आपल्या सोयीनुसार वळण देण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजशास्त्रज्ञ, इतिहासज्ञ, तत्त्ववत्ते, धर्ममार्तंड यांना फारसे यश या समाजाच्या बाबतीत आले नाही. कारण निसर्गातील तत्त्वे, नियम, जीवसृष्टीशी संबंध यातून या समाजाने स्वतःची जीवनमूल्ये ठरवली, सामाजिक व सांस्कृतिक संबंध निश्चित केले व अनैसर्गिक भेदभावाच्या वातावरणापासून तो अलिप्त राहिला. परंतु त्याला जे वाटले ते व्यक्त करता आले नाही व असहायतेमुळे, निमूटपणे अत्याचार गिळावे लागले.

आज तो आपल्या दबलेल्या आवाजाला वाट करून देण्याचा प्रयत्न करत आहे. राष्ट्रवाद, मानवतावाद, विकासवाद, जागतिकीकरण, बहुउद्देशीय औद्योगिकीकरण, सामाजिक-आर्थिक-राजकीय क्षेत्र या सर्वात आपले स्थान धुंडाळत असता अनुभवाला येणारी वास्तवता आपल्या दृष्टिकोणातून, अंगवळणी पडलेल्या शब्दांत, आपल्याला अवगत असलेल्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न आदिवासी करत आहे. हा ' दबलेल्यांचा आवाज ' आहे. त्यात मनधरणी करण्याला वाव नाही. शोषित-वंचित-उपेक्षित अवस्थेत इतरांना खूष करता यावे असे वाटणे अनैसर्गिक ठरणार आहे. म्हणून ' आदिवासी बोलू लागला ' ते लिहून प्रसिद्ध करण्याची चालना देणारे वाहरू सोनवणे व प्रकाशनाची जबाबदारी घेणारे प्रकाशक उषा वाघ, विलास वाघ यांचे आभार मानून मनोगत पुरे करतो.

**ॲड. माधव बंडू मोरे**

# आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ व मानवमुक्ती लढा

प्रथम 'आदिवासी' म्हणजे कोण, याची निश्चित व्याख्या काय, याचा विचार आपण केला पाहिजे. कारण राज्यकर्त्यांच्या सोयीनुसार कोणत्या मानवसमूहाला कोणता शिक्का मारायचा हे ठरवले जाते, ठरवले गेले आहे. त्या समूहाचा आत्मसन्मान काय ह्याचा विचार करण्याची राज्यकर्त्यांना गरज भासली नाही. त्या मानवसमूहाचा आपल्या दृष्टीने कसा उपयोग होऊ शकेल, ह्यासाठी आपल्या भाषेतील शब्द वापरण्याचा सतत प्रयत्न चालला आहे व होत आहे. इंग्रजांनीसुद्धा शिरगणती करताना १८९१ पासून १९४१ पावेतो पशुपाल जमात, पशुपूजक जमात, पहाडी-जंगली जमात, प्राचीन जमात, गुन्हेगार जमात असे शब्द वापरले आहेत. गिरिजन, वनवासी वगैरे प्रकारचे शब्दप्रयोग आजही केले जात आहेत. 'आदिवासी' शब्दाबद्दल चित्रविचित्र भावना दिसून येते. कारण तो शब्द आदिवासींचा धरतीमातेशी असलेला संबंध दाखवतो.

याबाबत जगात पर्यायी विचार झाला आहे काय, व झाला असल्यास भारतातील दृष्टिकोण त्यापासून वेगळा असू शकेल काय, असा प्रश्न निर्माण होतो. भारत सरकारच्या संयुक्त राष्ट्रसंघातील स्थायी शिष्टमंडळास वर्ल्ड कौन्सिल ऑफ इंडीजिनस पीपल (आदिवासींचे जागतिक मंडळ) ह्या गैरसरकारी, राष्ट्रसंघाने अधिकृत दर्जा दिलेल्या संस्थेने आदिवासींच्या प्रश्नांबाबत विचारले असता, "भारतात आदिवासी जनसमूह अस्तित्वात नाही व जे शिल्लक आहेत ते इतरामंध्ये विलीन झाले आहेत." असे सांगण्यात आले. हे कळल्यावर ३ ते ७ ऑगस्ट १९८७ या काळात 'इंडीजिनस कौन्सिल ऑफ इंडीजिनस ट्रायबल पीपल' ह्या आदिवासी संघटनेच्या वतीने प्रोफेसर किस्कू, डॉ. निर्मल मिज व आसामाचे समर ब्रह्म चौधरी यांनी जिनीव्हा येथे जाऊन भारतातील आदिवासींच्या अस्तित्वाची जाणीव संयुक्त राष्ट्रसंघाला करून दिली.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यकारी गटाने सात सत्रांतून आदिवासी प्रतिनिधींच्या उपस्थितीत आदिवासींची चार मुख्य लक्षणे निश्चित करून मान्य केली, ती अशी— (१) जगातील कोणत्याही भागात दुसराच मानवसमूह एखाद्या देशात, विभागात, प्रदेशात किंवा क्षेत्रात पोहचला त्यापूर्वी वस्ती करून असलेला. (२) वर्चस्ववादी नसलेला (अनाक्रमक) समूह. (३) सजीव सृष्टीशी एकरूप झालेला, सांस्कृतिक रीत्या वेगळा असलेला व (४) स्वतःला आदिवासी म्हणून ओळखणाऱ्या मानवसमूहाचे वंशज—ज्यात संयुक्त राष्ट्रसंघाने जुलूम, छळ व दडपणाचे बळी ठरलेले लोक ह्यांचाही समावेश केलेला आहे.•

ह्या व अशा लोकांच्या आत्मसन्मानाच्या चळवळीचा आपल्याला विचार करावयाचा आहे. तज्ज्ञ लोक चळवळीची व्याख्या करतात— "प्रस्थापित संबंध, संस्थामूल्ये ह्यांत बदल घडवून आणण्याच्या हेतूने, समर्पणभावनेने चालवलेला सामूहिक प्रयत्न ह्याला चळवळ म्हणतात." असा प्रयत्न आदिवासींना करता आहे काय, असाही प्रश्न पुढे येतो.

आदिवासी समाज वर्चस्ववादी नाही. जुलूम, छळ, दडपणाचा आजही तो बळी आहे. राजकीय व आर्थिक पद्धतीत त्याला सामावून घेण्यात आलेले नाही व त्याला क्षितिजाच्या वर येऊ दिले नाही. म्हणून त्याची चळवळ नजरेस भरण्याइतकी प्रभावी वाटली नाही तर आश्चर्य वाटण्याचे काहीही कारण नाही.

तरीसुद्धा जगातील ॲमेझॉन, फिलिपाइन्स, ब्राझील येथील आदिवासी जमाती सुसंस्कृत करण्याच्या नावाखाली नष्ट करण्यात आल्या आहेत. त्या मानाने भारतात एवढ्या भयानक हीन दर्जाचे शोषण, दडपण, सांस्कृतिक आक्रमण ह्यातून आपली भाषा, संस्कृती, जीवनपद्धती, कला, संगीत, नृत्य, रीतीरिवाज टिकवून ठेवण्यासाठी आदिवासींच्या वंशजांना जो मूक संघर्ष करावा लागला आहे तो अभिमान वाटावा असाच आहे. त्यामुळेच आदिवासींचे भारतातील अस्तित्व टिकून आहे. ह्याला अभिमानाची चळवळ म्हणता येणार नाही, असे कोणीही म्हणू शकणार नाही.

आदिवासी समाज समतावादी सह-अस्तित्वावर विश्वास ठेवणारा समाज आहे. परंतु ज्या वेळी परंपरागत स्वातंत्र्यावर आघात झाला, परंपरागत जीवनपद्धतीचा नाश होण्याची वेळ आली त्या त्या वेळी आदिवासींनी सत्ताधाऱ्यांच्या प्रयत्नाला यश येऊ दिले नाही व तो प्रयत्न हाणून पाडला. मध्य भारतात भिल्ल बंडखोरांनी १८१८ ते १८५८ पावेतो इंदूर ते नांदूर, बागलाण ते बऱ्हाणपूर, श्रीरामपूर ते सुलतानपूर ह्या भागात सतत ४० वर्षे जुलमी सत्तेविरुद्ध सशस्त्र लढा दिला. आपल्या स्वातंत्र्यासाठी ११ एप्रिल १८५८ रोजी आंबापाणीच्या लढाईत अटक झालेल्या ५७ भिल्ल बहादुरांनी ढोलाच्या ठोक्यावर बंदुकीच्या गोळ्या झेलून बलिदानाचा पहिला मान घेतला आहे. त्या वेळी स्त्रियाही मागे नव्हत्या. ४०० स्त्रियांना अटक झाल्याची त्या वेळच्या सरकारी पत्रकात नोंद आहे. त्या चळवळीने इंग्रजांचे सैनिकी तंत्र फोल ठरवून अनेक इंग्रजांना धडा शिकवला.

त्या वेळी रवाज्या, भिमा, तंट्या, भागोजी अशा आदिवासी वीरांनी ह्या मोहिमेचे नेतृत्व केले. हा संघटित लढा होता. त्यामागे आदिवासींचे एकरूप सांस्कृतिक अस्तित्व टिकवण्याचा हेतू होता. आदिवासींना अभिमान वाटावा अशीच ही चळवळ होती. तरीसुद्धा ह्याची इतिहासात नोंद नाही. आदिवासींना अभिमान वाटावा अशा गोष्टी पुढे आणल्या गेल्या नाहीत, ह्यामागे आपली सत्ता व सामाजिक वर्चस्व कायम राहावे असा प्रस्थापितांचा हेतू उघड आहे. आजही सातपुडा पर्वतात आंबापाणीच्या परिसरात व भागोजी नाईक ह्याला पकडण्याचा विडा उचलणाऱ्या व त्या मोहिमेत मृत्यू पावलेल्या कॅप्टन हेन्रीचे नांदूर शिंगोटीच्या जंगलात असलेले स्मारक आदिवासींच्या स्वाभिमानाचा पुरावा देत आहे.

अशा प्रकारे मुर्शिदाबाद, वासिमबाजार, मालदा, हुबळी ह्यासारख्या भागात बागदी आदिवासींनी, तसेच बिदनापूर भागात खोरा, माझी, चुडा ह्या आदिवासींनी जुलूम-शोषणाविरुद्ध १६१७ ते १६६७ पावेतो मोगल बादशहा, ईस्ट इंडिया कंपनीचे दलाल व जमीनदार ह्यांना वठणीवर आणण्यासाठी संघटित लढा पुकारला होता. जे.

सी. प्राईज ह्या इंग्रज इसमाने "मिदनापूरला कोणताही भाग आदिवासी बंडखोरीपासून वाचला नाही" असे लिहून ठेवले आहे. सिंहभूम चाईबासा ह्या भागात १८२३ ते १८२७ ह्या काळात मेजर रफरेज ह्याने आदिवासींनी आपल्या मताप्रमाणे वागावे यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्याला झालेल्या संघटित प्रतिकारामुळे मुन्डामान ह्यांच्या प्रथांना व प्रशासनाला मान्यता देणे रफरेजला भाग पडले.

संथाल परगणा गॅझेटिअरमध्ये स्वयंस्वाधीन संथाल परगणा स्थापन करण्याची मागणी आहे. संथालांच्या कलकत्ता अभियानात १२०० अधिकारी बेपत्ता झाल्याची नोंद आहे. भागलपूर, चिरकूम येथे १८५५ ते १८५७ ह्या काळात सर्रास लढे चालले. २६१ लोकांना पकडले. त्यात ४६ लोक हे १० वर्षांच्या आतील होते. संथाल परगणा व छोटा नागपूर कुळकायदा करायला इंग्रजांना आदिवासींनी भाग पाडले. ही केवळ बंडखोरी नव्हती, तर चळवळ होती. ही चळवळ आदिवासींची होती. ती कोणत्याही राजकीय सत्तेसाठी नव्हती, तर ती परंपरागत स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी होती. कोणत्याही ऐतिहासिक लढ्यात वेगळी नोंद नसली तरी आदिवासींनी महाराणा प्रताप व छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या ऐतिहासिक कामगिरीत आपले योगदान दिले आहे व त्याबद्दलसुद्धा आदिवासींनी अभिमान बाळगायला हवा. मेजर हसेलहुड पोलिस सुपरिंटेडेंट खानदेशच्या कलेक्टरला लिहिलेल्या ता. ५ मे १८५८ पत्रात म्हणतो, "जंगली पण लढाऊ, परंपरागत स्वातंत्र्य जपणाऱ्या, संशयी, रागीट पण उदार व माणुसकी असलेल्या ह्या आदिवासी लोकांनी ताब्यात सापडलेल्या स्त्रिया व मुलांच्या रक्ताने कधीही हात माखले नाहीत."

मानवमुक्ती लढ्याच्या संदर्भात परक्याने व्यक्त केलेले मत आदिवासींची मानवता व नैतिकता स्पष्ट करते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात शोषित, वंचित, उपेक्षित ठरलेला आदिवासी 'अस्मिते'चा शोध घेऊ लागला. आपली फसवणूक होते आहे, असे त्यास वाटून इतिहासात प्रेरणा शोधू लागला.

धुळे जिल्ह्यात गुलाब महाराज, रामदास महाराज यांनी केलेल्या जागतिक व संघटित प्रयत्नातून विशुद्ध क्रांतीचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नातून उभ्या राहिलेल्या चळवळीने आजही सातपुडा परिसरातील आदिवासी भारावलेला आहे. बिहारमधील निरसामुंडा ह्यांनी सुरू केलेली कायदेभंगाची सशस्त्र लढ्याची चळवळ शोषणमुक्त समाजासाठी उभी केली होती. ह्याबद्दल आदिवासींना स्वाभिमान व आकर्षण वाटले तर ह्यात नवल कुठले? स्वातंत्र्याच्या काळात नाशिक, नगर, धुळे ह्या जिल्ह्यांतून दादासाहेब सौंदाणे ह्यांनी आदिवासींच्या अस्मितेला जागृत केले व जगण्याच्या हक्कासाठी लढायला शिकवले. तसेच अंबरसिंग महाराज ह्यांनी सामाजिक न्यायासाठी उभी केलेली चळवळ आज थंडावलेली दिसत असली तरी निखारे जिवंत असण्याची लक्षणेही कायम आहेत.

आज भारतभर आदिवासींच्या चळवळी चालू आहेत. झारखंड, बोडो लॅण्ड, नर्मदा बचाव आंदोलन, तसेच ठाणे जिल्ह्यात किसान सभेच्या प्रयत्नातून तयार झालेल्या

आदिवासी कार्यकर्त्यांनी आज भूमिसेना, कष्टकरी संघटना, क्रांतिसेना, ग्रामस्वराज्य समिती ह्या व अशा संघटनांमधून काम करत असता आदिवासींनी जो अनुभव घेतला व त्यामुळे त्यांना जे कळून आले, त्यातून त्यांनी आपल्या कार्य करण्याच्या पद्धती व दिशा स्वयंविचाराने ठरवल्या तर इतरांना वाईट वाटण्याचे कोणतेही कारण नाही. ह्याउलट आदिवासी हा स्वतंत्रपणे आपले प्रश्न सोडवू पाहतो, ह्याला प्रोत्साहन देणे जरुरी आहे.

धुळे जिल्ह्यातसुद्धा श्रमिक संघटना, ग्रामस्वराज्य समिती, मजूर संघर्षवाहिनी यांच्यामध्ये काम करणारे आदिवासी कार्यकर्ते जागृत व सतर्क झाले असून त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या बहुतेक चळवळी जंगल, जमीन, मजुरी, शोषण यांसारख्या आर्थिक प्रश्नांवर झालेल्या आहेत. परंतु आदिवासींचे आर्थिक प्रश्न हे सांस्कृतिक व सामाजिक वर्चस्वातून निर्माण झाले आहेत, असे कार्यकर्त्यांनाही ठामपणे वाटू लागले आहे. समानता हे आदिवासींच्या अस्मितेचे महत्त्वाचे अंग आहे व ती जिवंत वास्तवता आहे.

मानवमुक्ती लढ्याचा विचार करताना असा लढा लढण्याची गरज कोणत्या कारणामुळे भासते हे विचारात घेतले पाहिजे. आदिवासी समाजाला ह्याची पूर्ण जाणीव आहे की, मानवमुक्ती लढा एकाकीपणाने लढता येणार नाही. तसेच एकाच देशात असा लढा उभा करून मानवमुक्ती लढा लढता येणार नाही. कारण आंतरराष्ट्रीय वातावरणापासून कोणताही देश अलिप्त राहू शकत नाही. सुपर औद्योगिक विकास, प्रचार, प्रसारमाध्यमात झालेला बदल व दळणवळणाची साधने ह्यामुळे सर्वदूर बदल दिसत असून राष्ट्रीय प्रवाहाचे प्रवर्तक आंतरराष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यास अति उत्सुक असून त्या दिशेने वेगाने जात असल्याचे दिसत आहे.

नेमके ह्याच वेळी संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक आदिवासींच्या हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. १२ डिसेंबर १९९२ ते ११ डिसेंबर १९९३ पावेतो आदिवासी वर्ष जगात साजरे झाले. असे असताना भारतातील आदिवासी आदिम जमातीत मोडत नाहीत, अशी भूमिका घेऊन भारत सरकार जगापुढे भारतातील आदिवासींचे अस्तित्व नाकारत आहे. ह्याला सर्व सहमत आहेत असे गृहीत धरावे काय? हा मानवमुक्ती लढ्याचा भाग आहे असे वाटते काय? जागतिक पातळीवर आदिवासींच्या चळवळी चालू आहेत. भारतातील आदिवासींनी त्यापासून अलिप्त राहावे अशी अपेक्षा करता येईल काय? असे प्रश्न उभे राहतात. ह्याची उत्तरे शोधली पाहिजेत.

आज आदिवासींचा भ्रमनिरास झाला आहे. सरंजामशाही, वसाहतवाद, साम्राज्यवाद ह्याविरुद्ध लढणारा आदिवासी आज देशी वसाहतवादाचा बळी ठरलेला आहे. परंपरागत जगण्याचे साधन असलेल्या जंगल-जमिनीवर शासकीय जमीनदारी प्रस्थापित झालेली आहे. विकासाच्या नावाखाली विस्थापन, मजुरीच्या नावाखाली वेठबिगारी व सुधारणेच्या नावाखाली मानसिक गुलामगिरी लादली जात आहे. आपले

म्हणणे कुणाच्या कानावर घालण्याचा व आपले प्रश्न सोडवण्याचा आंदोलन, चळवळ एवढाच प्रभावी मार्ग आहे, असा समज सरकारने पक्का करून दिला आहे. जगातील चळवळींपासून भारतातील आदिवासी अलिप्त राहू शकत नाहीत, उलट आदिवासींना अशा चळवळींपासून आपली दिशा ठरवता येऊ शकेल.

१२ ऑक्टोबर १४९२ रोजी वास्को-द-गामा हा अमेरिकेस प्रथम पोहोचला, त्या दिवसाला १२ ऑक्टोबर १९९२ रोजी ५०० वर्षे पूर्ण झालीत. तो दिवस साजरा करण्यासाठी १९८८ मध्ये स्पेनने संयुक्त राष्ट्रसंघात ठराव मांडला, परंतु तो दिवस वसाहतवादाची सुरुवात व अमेरिकेतील रेड इंडियन आदिवासींच्या गुलामगिरीची सुरुवात असे म्हणून ५० आफ्रिकन राष्ट्रांनी कडवा विरोध करून ठराव रद्द करणे भाग पाडले. अमेरिकेतील रेड इंडियन आदिवासींना गुलाम बनवणाऱ्या दिवसाला महत्त्व न देण्यासाठी आफ्रिकन राष्ट्रे पुढे येतात. हा मानवतेचा गहिवर आहे. १० डिसेंबर १९४८ हा मानवहक्क दिवस आदिवासी वर्षाच्या सुरुवातीचा दिवस ठरतो. ही आदिवासींना निश्चितपणे प्रेरणा देणारी घटना आहे.

आदिवासी हक्कांबद्दल संघर्ष करणारी ऑस्ट्रेलियाची आदिवासी कार्यकर्ती हेलेन कार्बेट म्हणते, "तुम्हाला बौद्धिक व सांस्कृतिक गुलाम केले जाते. ही तुम्हाला दिलेल्या तात्पुरत्या मानाची किंमत असते." ग्वाटेमाला (अमेरिका) येथील ३४ वर्षांची, १९९३ सालचे नोबेल पारितोषिकविजेती रेड इंडियन आदिवासी कार्यकर्ती रिगबर्ता मेंच्यू म्हणते, "संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेल्या हक्काच्या जाहीरनाम्याला मान्यता मिळवण्यासाठी द्यावा लागणारा लढा हा आदिवासी वर्षात महत्त्वाचा लढा आहे. आदिवासी प्रतिनिधी निवडण्याची पद्धत व हक्कांबद्दल अनिर्बंध आदर हाच भविष्यात आमच्यासाठी न्याय राहणार आहे." ह्यातूनसुद्धा आदिवासींच्या सन्मानाच्या चळवळीची दिशा मिळते. आदिवासी मुळातच वर्चस्ववादी नसल्याने त्यांची बंडखोरी, चळवळ, संघर्ष हे दुसऱ्यावर वर्चस्व गाजवण्यासाठी मुळीच नाहीत, तर शोषणमुक्ती व न्याय-हक्कांसाठी त्यांच्या चळवळी होत आल्या आहेत.

हा लढा लढत असताना पंचतारांकित संस्कृतीत वाढलेले, वर्चस्ववादी, स्वयंभू मानवी हक्काचे कैवारी ह्यांच्यापासून मानवमुक्ती लढा चार हात लांब ठेवणे जरुरीचे आहे. कारण प्रगती दिसत असली तरी वर्चस्ववादी तत्त्वानुसार मान्यता पावलेली मूल्ये विरोध करण्याचे स्वातंत्र्य जनतेला देत नाहीत व त्यामुळे लोकशक्ती क्षीण होत जाते.

म्हणून तळागाळातील समर्पित कार्यकर्त्यांनी मानवमुक्ती लढ्याची जबाबदारी घ्यावी व आदिवासी एकता परिषद मानवमुक्ती लढ्याच्या दिशेने वाटचाल करत असता वैचारिक चळवळीबरोबर कृतीचीही जोड देण्याची तयारी ठेवावी असे नम्रपणे सूचित करावेसे वाटते.

* * *

## आदिवासी सन्मानाची चळवळ

(आदिवासी एकता परिषदेच्या धुळे जिल्हा आदिवासी कार्यकर्त्यांच्या शिबिरात सादर केलेले टिपण. शहादा, ता. ३-४-१९९३)

'आदिवासी' या शब्दाबद्दल इतरांना आस्था अपेक्षित असण्याचे कारण नाही, कारण तो शब्द अडचणीचा आहे. इंग्रजीच्या प्रभावामुळे, नेटिव्ह इंडीजिनस पीपल असा शब्दप्रयोग जगभर वापरला जातो. परंतु सर्वमान्य व्याख्या अस्तित्वात नाही. मात्र संयुक्त राष्ट्रसंघाच्या आदिवासीबाबत योग्य-अयोग्य ठरवणाऱ्या कार्यकारी गटाने सात सत्रांतून चर्चा करून आदिवासी प्रतिनिधींच्या उपस्थितीत, सर्वमान्य असा मूळ गाभा विचारात घेऊन मूल्ये निश्चित केली.

दोस्तहो, एवढ्या भयानक व हीन दर्जाच्या शोषणातून, दडपणातून, सांस्कृतिक आक्रमणातून पिढ्या न् पिढ्या आपली भाषा, जीवनपद्धती, कला, संगीत, नृत्य, रीती अजूनही टिकवून धरण्यासाठी या समाजास जो प्रतिकार करावा लागला, आपले अस्तित्व टिकवण्यासाठी जो संघर्ष करावा लागला तीसुद्धा एक अभिमानास्पद मूक चळवळच होती, असे मी मानतो. आपल्याबद्दल इतरांनी कोणता दृष्टिकोण बाळगावा, कोणती विधाने करावी हा त्यांचा प्रश्न आहे. आपण ती खरी मानण्याचे कारण नाही. मुळात आपण समतावादी व सह-अस्तित्वावर विश्वास ठेवणारे आहोत. म्हणून एखादी चळवळ उगीचच हाती घेण्याचे कारण नव्हते व नाही.

परंतु आपल्या परंपरागत स्वातंत्र्यावर गदा आली, आपल्या जीवनपद्धतीवर आघात झाला, त्या त्या वेळी भारतात सर्वदूर या समाजाने बंडखोरी केली. ५७ बहादूर आदिवासींनी ढोलाच्या ठोक्यावर गोळ्या झेलून स्वातंत्र्ययुद्धात बलिदानाचा पहिला मान मिळवला आहे. नाशिक, नगर जिल्ह्यांतील आदिवासींनी या स्वातंत्र्ययुद्धात मोलाची भर घालून, तसेच नांदूर, शिंगोटीच्या भागोजी नाईकाने गोऱ्या साहेबांचे युद्धतंत्र धुळीस मिळवले. ही स्वातंत्र्यचळवळ आदिवासींना अभिमान वाटावा अशीच आहे.

याच काळात मालदा, हुबळी, वासिमबाजार, कलकत्ता या भागात माझी, चुडा, बागदी, खेरा व सिंहभूम या भागात मुंडामान चुडा या आदिवासी बांधवांनी मोगल, इंग्रज, जमीनदार यांची जुलूमजबरदस्ती, जबरीने जमीन बळकावणे, आदिवासींच्या सन्मानाच्या प्रथा मोडणे, अपमानास्पद वागणूक देणे असले प्रकार बंद पाडले आणि सत्ता व शस्त्रबळाने आदिवासी दडपले जाऊ शकत नाहीत हे दाखवून दिले. छोटा नागपूर, संथाल परगणा कुळकायदासारखे कायदे करायला भाग पाडले.

बिरसा मुंडा यांनी राजनैतिक आंदोलन चालवून आदिवासींचे परंपरागत अधिकार व संस्कृतीवरील आक्रमण याविरुद्ध संघर्ष पुकारला. १८९५ मध्ये शेतसारा न भरण्याचे व कायदेभंगाचे आवाहन केले. २० वर्षांची शिक्षा झाली. १८९७ मध्ये सोडावे लागले. १८९९ मध्ये सशस्त्र संघर्ष संघटित केला. ३ फेब्रुवारी १९०० ला पुन्हा अटक झाली. ९ जून १९०० मध्ये बिरसा मुंडाचा अंत झाला. अखेरपर्यंत संघर्ष करणाऱ्या आदिवासींना धार्मिक चळवळीची जोड देऊन आत्मसन्मानाची ओळख दिली. ठाणे जिल्ह्यात १९४५ मध्ये वारली आदिवासी बांधवांनी बंड केले, हा त्याचाच भाग आहे.

धुळे जिल्ह्यात गुलाब महाराज यांनी विशुद्ध पायावर आधारित समाजजागृती व

परिवर्तनासाठी उभी केलेली चळवळ आजदेखील आदिवासींना स्वाभिमानाची दिशा देते. अंबरसिंग महाराज यांचाही प्रभाव आहे. समाज अनुभवाने सतर्क होत आहे व तरुण पिढीस, विशेषतः सुशिक्षित वर्गास, आपल्या बुद्धीची, अस्मितेची, सत्त्वाची ओळख होऊ लागली आहे आणि त्यांच्यामध्ये असलेली ऊर्जा मार्गदर्शनाची व दिशेची वाट पाहत आहे.

स्थानिक प्रश्नांवर भारतभर चळवळी चालू आहेत. झारखंड आंदोलन, बोडोलॅण्ड आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, आंध्र-कर्नाटकमध्ये कलापथक, पथनाट्यद्वारा शोषण-दडपणाविरुद्ध चालू असलेल्या चळवळी या वेगवेगळ्या असल्या तरी आदिवासीस मानवी प्रतिष्ठेचे जीवन जगता आले पाहिजे हे त्यांचे समान सूत्र आहे.

आणि आता दूरदर्शन तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे प्रचार व संपर्कसाधनांनी जग लहान झाले आहे. राष्ट्रीय प्रवाह ही एक धूळफेक आहे असे विचारवंत बोलू लागले आहेत. राष्ट्रीय प्रवाह आंतरराष्ट्रीय प्रवाहाच्या दिशेने वेगाने जात आहे, असे स्पष्ट जाणवते आहे.

आदिवासींच्या संख्येचा विचार केला असता आशिया खंडात लोकसंख्या फार मोठी आहे. १९८८ पासून यूनोच्या सर्वसाधारण सभेत वास्को-द-गामाच्या पहिल्या सफरीस १० ऑक्टोबर १९९२ रोजी ५०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तो दिवस साजरा करावा असा स्पेनने ठराव मांडला व 'दोन जगांचा मीलन  दिवस' असे शहाजोग नाव त्यास दिले. परंतु वर्चस्ववादी जगाने समतावाद डावलून वसाहतवादाची सुरुवात व अमेरिकन आदिवासींच्या गुलामगिरीची व नाशाची कोनशिला ठरवलेल्या या दिवसाला ५० आफ्रिकन राष्ट्रांनी विरोध करून युरोपियन राष्ट्रांचा डाव हाणून पाडला व मानवीहक्क दिवस १२ डिसेंबर ही १९९२ आंतरराष्ट्रीय आदिवासी वर्षाची सुरुवात ठरवली. जागतिक पातळीवर आदिवासींना स्वाभिमान वाटावा अशी ही घटना आहे.

ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या हक्कांबाबत संघर्ष करणारी हेलेन कार्बेट म्हणते, "तात्पुरता भाव देऊन तुम्हाला आदिवासी म्हणून ओळख नाकारायला भाग पाडले जाते व तुमच्यातील वैशिष्ट्य नष्ट करून तुम्हाला बौद्धिक, सांस्कृतिक गुलाम केले जाते. ही तुम्हाला मिळालेल्या तात्पुरत्या मानाची किंमत असते." हीदेखील आपल्या सन्मानाची चळवळ पुढे नेण्याची दिशा असू शकते.

ग्वाटेमालाची ३४ वर्षांची रेड इंडियन आदिवासी स्त्री, १९९३ चे नोबेल पारितोषिकविजेती रिगबर्ता मेंच्यू अमेरिकेतील आदिवासींना म्हणते, "संयुक्त राष्ट्रसंघाने १९९३ हे आदिवासी वर्ष जाहीर केले आहे व आदिवासींच्या हक्काच्या जागतिक जाहीरनाम्याला मान्यता मिळवण्यासाठी द्यावा लागणारा लढा या वर्षातील महत्त्वाचा लढा राहणार आहे."

"आदिवासींची स्वतःचे प्रतिनिधी निवडण्याची विशिष्ट पद्धत आहे, तिला मान्यता मिळवली पाहिजे."

"आपली संस्कृती, आपले जंगल, जमीन, समुद्र, नद्या, आकाश यांचा, कोणत्याही

प्रकारच्या शिक्षेस पात्र न राहता, पद्धतशीरपणे नाश केला जात आहे. आपल्यातील जबाबदार व समर्पणाची जाण असलेल्या लोकांच्या संघर्षातूनच पर्यावरणाचे व निसर्गमातेचे संरक्षण व जतन शक्य आहे."

यातूनसुद्धा आपल्या सन्मानाच्या चळवळीची दिशा मिळू शकते. आपण मुळात वर्चस्ववादी नसल्याने आपली बंडखोरी, आपला संघर्ष, आपल्या चळवळी दुसऱ्यावर वर्चस्व गाजवण्यासाठी नव्हे तर शोषणमुक्तीसाठीच होत्या. जुलूम, जबरदस्ती, परंपरागत नैसर्गिक स्वातंत्र्याचा संकोच, जीवनपद्धतीवरील आक्रमण याविरुद्ध लढण्यासाठी आपल्या चळवळीचा उगम आहे. म्हणून आदिवासींच्या चळवळी ह्या ज्या स्वरूपात आहेत त्या स्वाभिमानाच्याच आहेत. स्वातंत्र्योत्तर मात्र आदिवासींच्या चळवळींना दिशाहीन व तत्त्वरहित राजकीय वातावरणामुळे आलेली मरगळ आता अनुभवाने नष्ट झाली आहे. आदिवासी एकता परिषदेच्या निमित्ताने आपण या ठिकाणी एकत्र आलो व विचार करू लागलो, हीसुद्धा अभिमानास्पद बाब आहे. यातून भविष्यात आपल्या पिढ्यांना अभिमान वाटावा अशी सामाजिक न्याय, आर्थिक समता, राजकीय प्रतिष्ठा व मानवी हक्कांसाठी एकरूप आदिवासी स्वाभिमानाची समर्थ चळवळ अव्याहतपणे चालत राहावी असे मला वाटते.

* * *

## आदिवासी व राष्ट्रीय मुख्य प्रवाह

'कितीही प्रयत्न केला तरी आदिवासी सुधारणार नाही' अशी प्रतिक्रिया तथाकथित स्वयंमान्य सुधारलेल्या लोकांत आढळून येते. "तुम्ही त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करा, ते दूर पळतात" असे बुद्धिवादी, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांना म्हणजेच तथाकथित मुख्य प्रवाहाबद्दल चिंता करणाऱ्यांना वाटते. शासनाच्या विकास योजनांद्वारे आदिवासींना राष्ट्रीय मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयोग चालू आहेत. आदिवासी विकास योजना हा त्यातलाच भाग आहे.

आदिवासी विकासासाठी उद्योग पुरविण्याच्या नावाखाली धरणे, रोड, विद्युत केंद्रे निर्माण करून करोडो रुपयांचा खर्च सरकार दाखवू शकते, परंतु अजून त्यांना लंगोटीयुगातून बाहेर आणण्यात यशस्वी झाले असे समाधान त्यांना वाटत नाही. मुख्य प्रवाहापासून आदिवासी फार मागे आहेत, असे दुःख ते व्यक्त करतात. एकात्मवादी लोक सर्वात जास्त चिंतातुर आहेत.

परंतु मुख्य धारा म्हणजे काय, हे समजणे किंवा समजावून देणे एवढे सोपे नाही. मुख्य धारा म्हणजे आर्थिक विकास असा अर्थ असावा असे वाटत नाही. मुख्य प्रवाह एखाद्या काळाशी, समाजाशी राष्ट्राशीसंबंधित सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रक्रियेचा भाग आहे काय? एखाद्या विकासव्यवस्थेशी तसेच संस्था-रचनांच्या संदर्भात तो असतो काय? मुख्य प्रवाह म्हणजे केवळ बौद्धिक कल्पना असून प्रत्यक्षात वास्तवतेशी त्याचा संबंध नाही असे तर नाही ना? शंका तर अशीही आहे की, मुख्य प्रवाह

शासकवर्गाच्या हातातील शोषणाचे व दडपशाहीचे हत्यारसुद्धा असू शकेल. मुख्य प्रवाहात सामील करण्याचे स्वप्न दाखवून कमजोर समाजाच्या ऊर्जेला, क्षमतेला भूल देऊन स्वस्त श्रम व उत्पादनातून अवैध मिळकतीच्या जोरावर विकसित समाजाची सत्ता व समृद्धी सुरक्षित ठेवण्याचे षड्यंत्र असू शकणार नाही, अशी हमी कोण देणार ?

सर्वमान्य व्याख्या नाही. मोजमापाचे साधन नाही. काळाच्या गरजेनुसार प्रवाहाचा संदर्भ बदलत आला आहे, असे इतिहास सांगतो. शक्तिशाली, आक्रमक, विकसित समाजापुढे आदिवासी समाज तग धरू शकणार नाही, असे सुचविण्यात येते. सामाजिक, सांस्कृतिक अस्मितेबाबत आग्रह न धरता औद्योगिक समाजाच्या आधुनिक प्रवाहात आदिवासींनी विलीन व्हावे, असे सूक्ष्म पातळीवर विचार करणारे सुचवतात.

परंतु मोठ्या पातळीवर विचार केला तर आधुनिक, औद्योगिक नागरी समाज युरोपियन, अमेरिकन समाजाचे अनुकरण करण्यास व त्यांच्या प्रवाहात सामील होण्यास उत्सुक आहे, असे स्पष्ट जाणवते. यालाच राष्ट्रीय प्रवाह म्हणता येईल काय ? तथाकथित भारतीय आधुनिक विकसित समाज पूर्ण विकसित झाला आहे असे म्हणता येईल काय ?

दिल्ली, कलकत्ता, मुंबईसारख्या शहरांतील समाजाच्या दृष्टीने लंडन, पॅरिस. न्यूयॉर्क, टोकियो, हाँगकाँग, सिंगापूर येथील समाज आदर्श समाज आहे व युरोप, अमेरिका, जपानप्रमाणे विकासाचे ध्येय आहे. मग आदिवासी समाजाने आधुनिक, विकसित, औद्योगिक शहरी समाजाशी एकरूप व्हावे ते कशासाठी ? या शहरी समाजाच्या संस्कृतीपासून ग्रामीण तथाकथित इतर समाजदेखील फार दूर आहे. तर आदिवासी समाजास आपल्या भोवतालचे दारिद्र्य, शोषण, दडपण, उपेक्षा व बौद्धिक आघातांच्या वातावरणातून मुक्त न करता, मुख्य प्रवाहाचे चित्र स्पष्ट नसता मुख्य प्रवाहात आणण्याचा आग्रह ही प्रस्थापित वर्चस्ववादी सत्तापिपासू लोकांनी चालवलेली धूळफेक आहे, असे वाटले तर चूक कसे ?

आणि मुख्य प्रवाहाची रूपरेषा कोणी ठरवावी ? 'याला मुख्य प्रवाह म्हणतात' हे ठरवणार कोण ? मुख्य प्रवाहाशिवाय अस्तित्व व भविष्य सुरक्षित राहणार नाही, अशा उच्च आवाजात घोषणा दिल्या जातात. विकास, प्रगतीसाठी आदिवासींनी या मुख्य प्रवाहात सामील होणे आवश्यक आहे असे सांगितले जाते. परंतु राष्ट्रीय पातळीवरील व आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रवाह कायम वेगळे व बदलते राहिले आहेत. एके काळी असंग्रह हा मुख्य प्रवाह होता. आदिवासी समाजात त्याचा प्रभाव अजून आहे. शेतीव्यवसायाला सुरुवात, राज्य व सत्ता यांचे अस्तित्व, उत्पादनवाढ व शिलकी उत्पन्नातून पातळी, दर्जा, वर्ग समाजात सुरू झाले व त्यातून प्रवाह-उपप्रवाह निर्माण झाले. निसर्गपूजा हाही एके काळी प्रवाह होता, नंतर मूर्तिपूजा, व्यक्तिपूजा असे प्रवाह आले.

समर्पण, त्याग असंग्रह ही प्रवाहाची अंगे होती. संघराज्य व औद्योगिक वाढ यामुळे उत्पादनसंबंध नष्ट झाले. उच्चवर्णीय अल्पसंख्यांक राज्यकर्ते होते व समाजाच्या

...का भागातील माणसे हीसुद्धा राज्यकर्त्यांची संपत्ती मानली जात होती. तोही त्या ... प्रवाह होता.

जन्मावरून जात ठरवली जात होती तो प्रवाह होता व अजून त्याचे अस्तित्व नष्ट ... नाही. आता विकासाची प्रगती व मुख्य प्रवाह यांचा संबंध कोठे येतो? यातून ...ा व उत्पादनाची साधने हातात असलेला वर्ग स्वतःचे हित, गरजा व अनुभव ...ात घेऊन समाजावर सर्व दृष्टीने स्वतःचे नियंत्रण राहावे यासाठी सामाजिक मूल्ये ठरवतो. इतरांनी त्यांचे पालन करावे अशी अपेक्षा ठेवून, आपला प्रस्थापित दर्जा कायम ...ण्याचे साधन म्हणून त्या पद्धतीला 'प्रवाह' म्हणून गळी मारण्याचा प्रयत्न होत आला आहे.

सत्तेचे प्रतिनिधी म्हणून इतिहासात राजपुत्र 'युगपुरुष' ठरले व त्यांच्या ...गण्याच्या पद्धतीला सामाजिक मूल्ये मानली गेली. त्या त्या काळातील त्याच पद्धतीने ...गणूक असलेल्या, परंतु सत्तेत नसलेल्यांना क्षितिजाच्या वर स्थान मिळाले नाही. ...ताधारी वर्गाला सोयीचे असे तत्त्वज्ञान, सामाजिक दर्जा व किंमत देण्याची पद्धत ...ंजामशाही काळात सर्वदूर दिसून येते. एकलव्य, शंबूक ही त्याचीच उदाहरणे आहेत. सरंजामशाही काळात जमीनदाराच्या युद्धात सामील होणे म्हणजे प्रवाहात सामील होणे असे होते. त्यानंतर औद्योगिक विकास हा प्रवाह बनला. देशपातळीवर सरंजामशाही व आंतरराष्ट्रीय पातळीवर साम्राज्यशाही असे प्रवाह होते. तसेच सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय पातळीवर प्रवाह होते. औद्योगिक क्रांती व पुनर्जागरण यामुळे सरंजामशाहीला धक्का बसला. लोकशाही, समता व न्याय याच्या घोषणा होऊ लागल्या. कॅथॉलिकविरुद्ध प्रॉटेस्टंट, फ्रेंच क्रांती, ऑगस्ट क्रांती यामुळे जगात व देशपातळीवर अनेकानेक प्रवाह निर्माण झाले.

आदिवासी समाजानेदेखील सरंजामशाहीविरुद्ध बंडखोरीचा प्रवाह निर्माण केला होता. हा परिवर्तनातून नवी नवी सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय समीकरणे निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. तरीदेखील सत्तेतील नेते जुन्या संस्था व जुनी मूल्ये टिकवण्यासाठी परिवर्तनाला विरोध करत आले आहेत व मूठभर लोक सामाजिक मूल्ये ठरवत आले आहेत. वर्गात वर्ग व प्रवाहात प्रवाह अशी स्थिती आहे. तरीदेखील हेतू एकच आहे : दलित-शोषित-मागासवर्गीय समाजाच्या श्रमशक्तीवर अतिरिक्त उत्पन्न वाढवून ते सत्तेच्या जोरावर हस्तगत करणे. त्यासाठी कायदेशीर किंवा बेकायदेशीर आवरण निर्माण करून शोषण, दडपणूक, अन्याय झाकून ठेवणे. स्फोटक स्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घेणे व मागासवर्गीयांवर अंमल चालू ठेवणे.

आज मालक राष्ट्रे ठरवतील तो मुख्य प्रवाह मानणे व त्यामागे पळणे ही वस्तुस्थिती आहे. मुख्य प्रवाहाच्या नावाखाली वर्चस्ववादी राष्ट्रांच्या मागे पळत जाऊन त्यांच्या मुख्य प्रवाहात मिसळून जाण्याची आपली धडपड आहे. बहुविध औद्योगिक विकासामुळे उद्देश समजणे कठीण आहे. राजकीय नेत्यांना सुपर औद्योगिक मालक राष्ट्रांचा प्रवाह स्वीकारणे भाग पाडले आहे. ग्राहक चळवळ हा त्याचाच भाग आहे.

आपल्या आवडी-निवडी त्यांच्या सोयीनुसार बदलल्या आहेत. आपल्याला जगाने असंस्कृत म्हणू नये म्हणून ही धडपड आहे. त्या प्रवाहाची श्रेष्ठता स्वीकारणे भाग आहे, कारण आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून लहान-मोठ्या योजनांसाठी हिरव्या झेंड्याची अपेक्षा असते.

औद्योगिक विकासाचे नावाखाली अदृश्य साम्राज्यवादाच्या मुख्य धारेमध्ये ओढले जाण्याची प्रवृत्ती व मानसिकता आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात वावरणाऱ्या भारतीयांना लागलेली सुपर संस्कृतीची चटक यामुळे नवसाम्राज्यवादाच्या स्वरूपात आपपरभाव ओळखता येणे कठीण तर आहेच, परंतु भारताच्या हितासाठी मालक राष्ट्रे प्रयत्नशील आहेत असे भासवण्याचा प्रयत्न करणेसुद्धा राष्ट्रीय प्रवाहाचा भाग आहे, असे गळी मारले जात आहे. सोव्हिएत संघाच्या पतनामुळे साम्राज्यवादाचा रस्ता मोकळा झाला असून नवीन आर्थिक-राजकीय प्रवाह पुढे येत आहे. युरोप-अमेरिकाद्वारा नियंत्रित उपभोगवादी सुपर संस्कृती 'मुख्य धारा' म्हणून आपले अस्तित्व पक्के करत आहे. नाझीझम, फॅसिझम अशाच प्रकारचा एके काळी जर्मनी-इटालीचा मुख्य प्रवाह होता. मुख्य प्रवाह ही त्या त्या काळात गरजेनुसार सत्ता व साधने असलेल्या वर्चस्ववादी देश किंवा समाजवर्ग यांनी लादलेली इच्छा आहे. याची जाणीव झालेला देश किंवा समाज ते मान्य करण्यास तयार नसतो. प्रत्येक समूहाला आपली अस्मिता, अस्तित्व धोक्यात आहे, असे वाटून अस्वस्थता निर्माण होते व सामाजिक आक्रमकता वाढते. त्यांचा उपयोग करून सत्ता हस्तगत करण्याचे प्रयत्न चालू होतात. अशा वातावरणात आदिवासी समाजाच्या संदर्भात मुख्य प्रवाहाचा विचार लादण्यासाठी चिंतेत असलेल्या या विचारवंतांनी जागतिक स्थितीकडे डोळेझाक का करावी ?

साधा, भोळा आदिवासी आक्रमक प्रवाहात विलीन व्हावा का ? आपली सामूहिक निष्ठा सोडून व्यक्तिनिष्ठ का बनावे ? इतर लोकसमूहाचे उपप्रवाह वाढू न देता त्यांच्या दृष्टीने त्यांचे युगपुरुष, ग्रंथ, कथा लादून सोयीनुसार मुख्य प्रवाह असल्याचा भास निर्माण केला, तोही बहुविध, बहुरंगी. आंतरराष्ट्रीय मजूर संघाने सप्टेंबर १९८६ मध्ये एकमताने जाहीर केले की, एकात्मतावादी प्रयोग थांबवले पाहिजेत. सांस्कृतिकदृष्ट्या आदिवासी कमी दर्जाचे आहेत हा भ्रम काढून टाकला पाहिजे. जमिनीच्या परंपरागत सामुदायिक मालकीला मान्यता दिली पाहिजे व विकासप्रक्रियेत आदिवासी जीवनपद्धतीचा नाश होणार नाही याचे भान ठेवले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय संघाच्या ठरावाच्या २७ व्या कलमात नागरी व राजकीय हक्कांबाबत दोन महत्त्वाच्या आवश्यकतांचा समावेश केला आहे. मानवी हक्क उपकमिशन वांशिक भेद नाहीसे करण्यासाठी सर्व राष्ट्रांना आवाहन करते की, "ठराविक क्षेत्रात राहणाऱ्या अल्पसंख्यांक जनसमूहाला शासकीय मान्यता दिली पाहिजे व त्यांची वांशिक ओळख कायम ठेवण्यासाठी व त्यांना राजकीय-आर्थिक-सामाजिक समता प्राप्त व्हावी यासाठी खास उपाय योजले पाहिजेत."

परंतु भारतात हे महत्त्वाचे मूलभूत अधिकार प्रदान करण्यासाठी कोणालाही सवड

सापडली नाही व त्यामुळे ऐतिहासिक सत्य नाकारल्याने इतर हक्कदेखील आदिवासींच्या पदरी पडू शकले नाहीत. एकात्मतेसाठी समान दर्जा हे गृहीतक आहे व त्या मानवी समूहाला तशी इच्छा झाली पाहिजे.

परंतु नक्राश्रू ढाळणाऱ्या सर्व विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ यांनी भारतात योजना तयार करण्यात आदिवासी समाजाचे अस्तित्व विचारात घेण्याचा आग्रह धरल्याचे कोठेही नमूद नाही. घटनेत तरतूद असूनसुद्धा केंद्र व राज्य सरकार नागरी व मानवीहक्काचे संरक्षण आदिवासींना देऊ शकले नाही. इतर ठिकाणी वंशवादाविरुद्ध लढायची भाषा करणारे आपल्याच घरातील तशाच परिस्थितीशी लढू शकत नाहीत.

अशा परिस्थितीत स्वतःबद्दल भ्रामक कल्पना बाळगणाऱ्या समाजाच्या नादी लागून आदिवासी समाजाने मानवता, अस्मिता सोडावी काय? माजी राज्यपाल दिघे यांनी आदिवासी संस्कृती समजून घेतल्याशिवाय अखंडतेचा जप व्यर्थ आहे असे नमूद केले आहे. चपटे नाक, बारीक डोळे, गालाची हाडे वर आलेल्या व्यक्तीस 'चिनी आहे काय?' असे विचारले तेव्हा 'भारतीय आहे' असे उत्तर मिळाले. मेघालय, त्रिपुरा, नागालँड, अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर येथील आदिवासी जास्त सभ्य आहेत, जास्त बुद्धिमान आहेत, असे विशेष पत्रप्रतिनिधी म्हणतो. आपली अस्मिता, संस्कृती, मानवता प्रवाहात झोकून कशाच्या आधारावर आपली भौतिक प्रगती करू शकतो? विकासासाठी मानवसमूह नष्ट होऊ द्यावेत काय? मुख्य प्रवाहाचा नियंता वर्ग हाच सिद्धान्त मांडत आला. काहींच्या फायद्यासाठी काहींच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन समर्थनीय ठरू शकत नाही.

काळाला अनुसरून सर्वोपयोगी विचाराच्या आधारावर मुख्य प्रवाह निर्माण करावयाचा असेल तर आतापर्यंत सत्तास्थानांचा, उत्पादनसाधनांचा ज्या मानवसमूहाने पुरेपूर नव्हे तर अतिरिक्त उपभोग घेतला आहे, त्याने त्याची किंमत अदा करायची तयारी ठेवली पाहिजे.

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित व शक्तिशाली समाजाने ज्या मानवसमूहाला शोषित, वंचित ठेवण्यासाठी आपल्या शक्तीचा, बुद्धीचा दुरुपयोग केला त्या मानवसमूहाला आता विकासाचा भार कोणाच्या खांद्यावर आहे, मुख्य प्रवाहाच्या नावाखाली कोणाला बळी जावे लागले आहे, आपल्यामधील नायक व त्यांचे कर्तृत्व यांना स्थान का मिळाले नाही, आपल्या अस्मितेविषयी ज्ञान का मिळू दिले नाही, याचा विचार करावा लागला आहे. आदिवासी भिल्ल समाजाने १८१८ ते १८५८ पावेतो अन्याय, अत्याचार, जुलूम, जबरदस्तीविरुद्ध सशस्त्र बंडखोरी केली. परंतु स्त्रिया-मुलांच्या रक्ताने कधीही आपले हात माखले नाहीत, असे मेजर हसेलवुड या इंग्रज अधिकाऱ्याने नमूद केले आहे. परंतु मुख्य प्रवाहवादी समाजाने या आदिवासी परंपरा हिणकस ठरवून आपल्या बौद्धिक आक्रमणातून वर्चस्ववाद कायम ठेवला.

खाज्या, उमाजी, भागोजी, तंट्या, बिरसामुंडा, गुलाब महाराज, रामदास महाराज यांनी कोणत्याही प्रवाहात झोकून न देता वर्चस्ववादी, साम्राज्यवादी, सरंजामदार यांचा

अन्याय, अत्याचार खपवून घेतला नाही, परंपरागत स्वातंत्र्य अबाधित राखले. परंतु मुख्य प्रवाहाच्या प्रतिनिधींच्या दृष्टिकोनात बदल झाला नाही. राष्ट्रीय सणांना 'आदिवासींची वेगळी संस्कृती' म्हणून प्रदर्शन भरवायला महत्त्व दिले. स्वतःबद्दल भ्रामक कल्पना असलेल्या समाजाकडून आदिवासी अस्मिता उपेक्षित राहिली हा इतिहास आहे. आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय सभ्यता-संस्कृतीच्या प्रवाहातील फवारा फक्त आदिवासींच्या वाट्याला येईल. यापेक्षा जास्त अपेक्षा आदिवासी करू शकत नाही.

अमेरिकेतील रेड इंडियन्स, ब्राझीलमधील कोगुई, अॅमेझॉन, फिलिपाईन्समधील बंटूक, कलिंग या आदिवासींना सुधारण्याच्या नावाखाली सशस्त्र टोळ्यांचा धाक दाखवून, दारूचे पाट वाहवून, रोगराईचा फैलाव करून, कर्जबाजारी करून जमिनी बळकावल्या. त्यांना निराधार केले व कित्येक वंश नष्ट केले. बांगला देशात सुमारे १२०० आदिवासींना घरात कोंडून सैनिकांनी जिवंत जाळले. इराकमध्ये कुर्दिश आदिवासींवर अशाच प्रकारचे दडपण, अन्याय चालू आहेत. आदिवासी संबंधात धर्माचा विचार गौण आहे. न्याय, तत्त्व, बुद्धी वापरण्याचे बंधन नाही.

आंतरराष्ट्रीय पातळीवर बहुउद्देशीय औद्योगिक साम्राज्यवादाचा प्रवाह आहे, तर देशपातळीवर सामाजिक अस्वास्थ्याचा प्रवाह आहे. निषिद्ध मानले गेलेले वंशवाद, जातीवाद, धर्मवाद उफाळून वर येत आहेत. आदिवासींना सवर्ण बनवण्याचा खटाटोप चालू आहे. हा प्रयोग सुरू करण्याआधी या समाजाची मार्गदर्शक बुद्धी समजून घेण्याऐवजी आदिवासी समाजाची अस्मिता नष्ट करण्याचा उद्योग म्हणजे आपण जागतिक पातळीवर मालक राष्ट्रांच्या प्रवाहासाठी उत्सुक असता आदिवासींनी आपल्या इच्छापूर्तीचे साधन बनावे यापलीकडे याचा उद्देश दिसत नाही.

अशा वेळी आंतरराष्ट्रीय पातळीवरील सशक्त, समृद्ध देशापासून विकासाच्या नावाखाली विकसित देशाचे अनुकरण करून धावपळ करीत असलेले तिसऱ्या श्रेणीतील देश फार दूर आहेत. नवसाम्राज्यवादाची मदत घेऊन आपणसुद्धा शक्तिशाली, समृद्ध राष्ट्र बनू शकतो. अशा प्रकारचे ते स्वप्न नव्हे मृगजळ आहे, असे आदिवासींना वाटते. स्वतः सुसंस्कृत, सभ्य म्हणवून घेणाऱ्या समाजाने मानवजातीला लाज वाटावी अशा कितीतरी गोष्टी घडवून आणल्या. त्याही त्या त्या वेळच्या मुख्य प्रवाहाच्या नावाखाली. परंतु त्या वेळचा मुख्य प्रवाह हा मानवतेविरुद्ध अक्षम्य अपराध होता, असे कबूल करायला तथाकथित सभ्य समाज धजत नसला तरी इतिहासाला ते लपवता आले नाही.

म्हणून आदिवासी समाज हा पूर्ण विकसित मानव असता त्याला मानवी प्रतिष्ठेचे जीवन जगण्यात येणारे सर्व प्रकारचे अडथळे दूर व्हावेत, यासाठी सर्व पातळीवर जागरूकता निर्माण करणे हे आदिवासींमधील सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या, समर्पण व त्यागाची तयारी असलेल्या, बुद्धिवादी विचारवंतांसाठी काळाने उभे केलेले आव्हान आहे. तथाकथित एकात्मतावादाची ओळख करून घेताना ममता नाही तेथे समता नाही, तेथे एकता नाही. जागतिक पातळीवर आदिवासींचा मानवतावादी, अनाक्रमक, सहजीवन

व सहअस्तित्व यावर विश्वास असलेला प्रवाह निर्माण झाला असून संयुक्त राष्ट्रसंघाने १२ डिसेंबर १९९२ ते ११ डिसेंबर १९९३ पावेतो आदिवासी वर्षाची घोषणा करून जगातील आदिवासींना एक प्रकारे संधी प्राप्त करून दिली आहे.

शोषणरहित निर्भय समाजनिर्मितीचे ध्येय बाळगणाऱ्या, आदिवासींचे परंपरागत नैसर्गिक स्वातंत्र्यासाठी जिवाचे रान व रक्ताचे पाणी करणाऱ्या आदिवासी युगपुरुषांना अभिवादन करून जागतिक पातळीवरील आदिवासींच्या हक्काच्या जाहीरनाम्याला मान्यता मिळवण्यासाठी या वर्षाचा उपयोग व्हावा असा प्रयत्न करण्याचे ग्वाटेमालाच्या रिगबर्ता मेंच्यू या नोबेल पारितोषिक (१९९३) विजेत्या आदिवासी कार्यकर्तीचे आवाहन भारतातदेखील घुमावे व तथाकथित राष्ट्रीय प्रवाहवादींच्या भ्रामक दिशा व आक्रमक वर्चस्ववादाला प्रतिबंध करण्यासाठी संघटित शक्ती उभी करून, घातकी तत्त्वज्ञानावर आधारलेल्या आक्रमणवादास प्रतिबंध करावा, याकरिता आपला मानवतावादी सांस्कृतिक प्रवाहास आपल्या अस्मितेच्या आधारावर पुढे नेण्याचा प्रयत्न करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

* * *

## आदिवासी एकतेची आवश्यकता व दिशा

आदिवासी एकतेची आवश्यकता भासली नाही, याचे कारण आदिवासीने कोणालाही परके मानले नाही. स्वतः वर्चस्ववादी नसल्याने इतरांनी बाळगलेला आपल्याबाबतचा दृष्टिकोण तसाच असावा असे मानून त्यांच्या व्यवहाराकडे दुर्लक्ष केले. परंतु आज आपल्या पिढ्या सुरक्षित राहतील किंवा नाही असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा आहे. जीवन जगण्याच्या साधनांचा नाश, विस्थापन, जमिनीचे हस्तांतरण यातून जीवनपद्धतीचा, सामाजिक मूल्यांचा व पर्यायाने आदिवासी संस्कृतीचा नाश उघड दिसत आहे. शोषित्त, वंचित, उपेक्षित आदिवासींच्या दबलेल्या आवाजाला खऱ्या अर्थाने वाट करून देण्यासाठी काळाने आपल्याला एकत्र येणे भाग पाडले आहे.

आज आदिवासी समाजाचे अस्तित्व नाकारले जात आहे. आदिवासी भारताचा एक नागरीक आहे, भारताच्या प्रगतीत त्याचा हिस्सा आहे, असे मानले जात नाही. त्याला सहभागी करून न घेता प्रजादक्ष राजा आदिवासी प्रजेच्या विकासाची, सवलतीची जाहिरातबाजी करत आहे. मागास, कमजोर वर्गाच्या कल्याणाच्या घोषणा करून व सर्वसाधारण प्रश्न ठरवून सर्वसाधारण पद्धतीने ते सोडवण्याचे प्रयत्न करत आहे.

परंतु सर्वसाधारण पद्धतीत प्रथम वरच्या भागातील लोकांना प्राधान्य द्यावे लागेल व त्यांच्या कल्याणासाठी आदिवासींचे सर्व प्रकारे शोषण चालू ठेवावे लागेल. यालाच या देशाची प्रगती, विकास म्हटले जाते. यात आदिवासीला स्थान आहे कोठे ?

भारत सरकारचा आदिवासींबाबतचा दृष्टिकोण आंतरराष्ट्रीय संघातील भारत सरकारच्या स्थायी शिष्टमंडळाने जाहीर केला आहे व भारतातील आदिवासींचे अस्तित्व

नाकारले आहे. भारतात अनुसूचित जमाती आहेत, आदिवासी नाहीत. आदिवासींचे अलग प्रश्न नाहीत, समाज म्हणून त्यांना वेगळे मूलभूत अधिकार नाहीत. आंतरराष्ट्रीय संघाने आदिवासींच्या हक्कांचा जागतिक जाहीरनामा प्रसिद्ध केला तो भारतात लागू नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय आदिवासी वर्ष साजरे करण्याची भारत सरकारला गरज भासली नाही.

इंग्रजांनी ट्राईब म्हटले, त्याआधी निरनिराळी कमीपणा आणणारी नावे ठेवून, आपले वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी भाकडकथा रचून, बौद्धिक वर्चस्वाला धार्मिक आधार देऊन अपमानित जीवन लादले व सांस्कृतिक आक्रमणातून सामाजिक व राजकीय हद्दपारी आदिवासी समाजाच्या वाट्याला आली.

आतापर्यंत आदिवासी या शब्दाच्या अर्थाबद्दल कीस काढण्याचा प्रयत्न कधी केला नाही. म्हणून त्याबद्दल प्रश्न उपस्थित झाला नाही. परंतु ऐतिहासिक सत्य नाकबूल करून जर एखाद्या मानवसमूहाचे अस्तित्वच नाकारण्यात येत असेल तर, त्या समूहाचे मानव म्हणून, नागरीक म्हणून जगण्याचे सर्व अधिकार धोक्यात येतात. याची जाणीव स्वतःला आदिवासी म्हणवणाऱ्या समूहाला झाली आहे. त्यामुळे आपल्या अस्तित्वाचा शोध घेऊन आपली ओळख टिकवण्याचा प्रयत्न हा समाज करू लागला आहे.

आदिवासींच्या ओळखीची भौगोलिक, ऐतिहासिक, वांशिक, भाषिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहेत आणि तीच महत्त्वाची आहेत. त्यामुळे आदिवासींचे वेगळेपण टिकून आहे. ती वैशिष्ट्ये प्रकट करण्यासाठी वेगळ्या पद्धतीची आवश्यकता आहे.

आदिवासींना एकत्र आणून सुरक्षिततेची भावना निर्माण करणारी कोणती पद्धत आहे ? कोणते तत्त्वज्ञान आहे ? कोणती दिशा आहे ? हे ठरवताना भूतकाळाचा मागोवा, वर्तमान परिस्थितीची कारणे, भविष्याची चिंता हवी. कोणत्याही तत्त्वज्ञानात कमी-अधिक प्रमाणात समाजाबद्दल जाणीव, भविष्याचे स्वप्न आणि ते सफल करण्यासाठी उपयोगात आणावयाच्या निर्णायक पद्धती यांचा समावेश असतो.

तत्त्वज्ञानाने भारलेले लहान समूहसुद्धा यशस्वी झाले. ज्यांना एकत्र आणणारे तत्त्वज्ञान नव्हते असे समूह जगाच्या पाठीवरून नष्ट झाले. शोषण, दडपण, आक्रमण यातून आदिवासी समाज टिकून आहे, आपली संस्कृती, नृत्य व जीवनपद्धतीसुद्धा त्याने टिकवून ठेवली, त्यामागे कोणते तत्त्वज्ञान होते, याच्या मुळाशी आपण गेले पाहिजे. कोणतेही खरे तत्त्वज्ञान लोकांच्या कष्टातून, दुःखातून, त्यांच्या परस्परांबद्दलच्या ममता व करुणा यातून निर्माण होते. ममता असेल तर समता असेल, तेथेच एकता असू शकेल. हस्तिदंती मनोऱ्यात बसून पंचतारांकित संस्कृतीच्या वर्चस्ववादी लोकांनी प्रसारमाध्यमांतून मोठ्या आवाजात जाहीर केलेले तत्त्वज्ञान या ठिकाणी गैरलागू आहे.

आपला इतिहास काय आहे, याबाबत आदिवासी समाजाला आपल्या परंपरेतून बनलेल्या स्वभावातून, नैसर्गिक स्वातंत्र्याच्या ओढीतून ज्ञान होऊ शकते. जो काही थोडा इतिहास उपलब्ध आहे, त्यावरून आदिवासींच्या अस्तित्वाचा काळ फार जुना आहे व सर्व वर्चस्ववादी व वसाहतवादी संस्कृतीविरुद्ध संघर्षाचा इतिहास आदिवासींचा

खात्यावर आहे हे स्पष्ट होते. आतापर्यंत इतरांच्या तत्त्वज्ञानाचा अनुभव त्यांनी घेतला आहे. आता त्यांना त्यांच्या सांस्कृतिक ओळखीच्या उगमाकडे वाटचाल केल्याशिवाय पर्याय नाही. त्यासाठी सांस्कृतिक आक्रमण व वर्चस्वातून आदिवासी संस्कृती नष्ट करण्याच्या प्रयत्नात असलेल्या उघड अथवा गुप्त शक्तींची ओळख होणे आवश्यक आहे. शतकानुशतके ज्या शक्ती आदिवासी हा पूर्ण विकसित मानव आहे असे न मानता त्यांनी स्वत: निर्माण केलेल्या साच्यात ओतून निर्जीव करण्याच्या प्रयत्नात आहेत त्यांच्यापासून आदिवासी सावध होत आहेत, ही सर्वात महत्त्वाची घटना आहे. सामाजिक व ऐतिहासिक पृथक्करणाने त्या शक्तींची ओळख करून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यात जागृती व पुनर्जागृती करणे आवश्यक आहे.

एकमेकांच्या जीवनपद्धतीबद्दल आदर, आपसात सहकार्य व सहअस्तित्व ही आदिवासींची पद्धत आहे. त्याला छेद देणारी कोणतीही पद्धत आदिवासींना परवडणारी नाही. ऐतिहासिक जाणिवेवर सांस्कृतिक एकता आधारलेली असते. जर आपली ओळख टिकवायची असेल तर हर प्रकारची अधिकारशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण, सांस्कृतिक वर्चस्व आणि साचेबंद आर्थिक नियोजन याविरुद्ध तोंड द्यावे लागेल.

आदिवासींबाबत भारत सरकारचा नकारात्मक दृष्टिकोण असला तरी ढेबर कमिशनने व्याख्या करताना आंतरराष्ट्रीय श्रमिक संघाने अनुसूचित जमातींनाच आदिवासी म्हटले आहे. जागतिक बँकेने भारताच्या संदर्भात अनुसूचित जमातींचा आदिवासी लोक असाच अर्थ होतो अशी मान्यता दिली आहे. आंतरराष्ट्रीय श्रमिक संघाने १९५७ साली आदिवासींच्या सुरक्षिततेचा दस्तऐवज १०७ वर भारताने १९५८ साली मान्यता देणाऱ्या २७ देशांबरोबर सही केली आहे. त्याची अंमलबजावणी जून १९५९ पासून होणार होती, हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे.

आंतरराष्ट्रीय श्रमिक संघाने जो १९८९ मध्ये ठराव केला तो पहा. दस्तऐवज नं. १६९ वर सही करण्याचे नाकारले आहे. तो ठराव सांस्कृतिक, नैसर्गिक साधने व सामूहिक ओळख असे हक्क आदिवासींना देतो. भारतातील आदिवासींचे स्वतंत्र अस्तित्व न मानण्यामागे जागतिक आदिवासी हक्कांचा जाहीरनामा मान्य करावा लागू नये हा उद्देश स्पष्ट दिसतो. यालाच अनुसूचित जाती-जनजाती आयोगाने आपल्या २९ व्या अभिप्रायामध्ये 'घटनात्मक संकट' म्हटले आहे.

आदिवासींना आपली सुरक्षितता धोक्यात आली आहे असे वाटते. त्यांना त्यांची निर्माणशक्ती उपयोगात आणता येत नाही व भविष्य बनवण्यात अडथळे येतात. आदिवासी संस्कृतीत पुरोगामी प्रणालीची, राष्ट्राचा गौरव वाढवण्याची बीजे आहेत; नव्हे त्यांना संधी मिळाली तर संपूर्ण देशाच्या सांस्कृतिक रचनेसाठी ती एक नमुना ठरू शकते.

जगातील आदिवासींपैकी २३ टक्के आदिवासी भारतात आहेत. भारतातील ६ करोड आदिवासींची संयुक्त राष्ट्रसंघात नोंद आहे. भारतात ७ टक्के आदिवासी लोकसंख्या असली तरी २० टक्के जमिनीवर त्यांचा हक्क आहे. परंतु कायदा करून

४० ते ८० टक्के आदिवासींची मान्यता काढून घेण्यात आली. ४० ते ५० लाखांना अतिक्रमणदार ठरवून असहाय्य केले गेले. ८५ टक्के लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहेत. आज जंगल—जमीन हे आदिवासींच्या भविष्याचा विचार न करता उद्योगधंद्यांना कच्चा माल पुरवणारे साधन मानले जाते. मात्र उत्पादनांच्या साधनांपासून त्यांना वंचित करून दारिद्र्यात ढकलले जात आहे. जास्तीत जास्त आदिवासी विस्थापित होत आहेत. आदिवासींच्या जमिनीचा कायदा झाला आणि अंमलबजावणीअभावी तो कायदा पुस्तकातच राहिला.

आदिवासी आपल्या मानवी हक्कांसाठी झगडत आहेत. त्यांच्या परंपरागत वहिवाटी हक्कांची त्यांची मागणी आहे. पिढ्यान् पिढ्या वापरात असलेली जीवन जगण्याची आदिवासींची साधने सार्वजनिक मालकीची कशी? मनाई, तहकुबी, पुनरावलोकन, हक्कनोंदीत बदल, मजूर कायद्याचे उल्लंघन या सर्व पद्धतींचा उपयोग आदिवासींना वंचित ठेवण्यासाठी केला जात असता आदिवासी ताठपणे जगू शकत नाही. त्याचा गैरफायदा घेण्यासाठी सर्व टपलेले आहेत.

या सर्व भूतकाळातील गोष्टी. वर्तमान स्थिती विचारात घेऊन भविष्याला सामोरे जाण्यासाठी समर्पण भावनेने पुढे जावे लागणार आहे. केवळ आर्थिक प्रश्नांची सोडवणूक म्हणजे विकास म्हणता येणार नाही. राजकीय प्रक्रियेच्या दिशाहीन भोवऱ्यात सापडलेला एखादा आदिवासी सर्व आदिवासींची विकासाची दिशा चुकवू शकतो. आज भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. पैसा, शक्ती, अधिकार यांचा दुरुपयोग ही सत्तेवर राहण्याची किंवा सत्ता बळकावण्याची गुरुकिल्ली आहे.

आदिवासींनी प्रथम प्रस्थापितांचे सामाजिक-सांस्कृतिक वर्चस्व झुगारले पाहिजे. कोणत्याही प्रकारे वर्चस्ववादी, सत्तापिपासू राजकारणी लोकांच्या साठमारीला बळी पडता कामा नये.

म्हणून आदिवासी एकता परिषदेच्या दिशा ठरवताना सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक व राजकीय वर्चस्व गाजवणाऱ्यांना त्यांचे ठिकाण दाखवण्यासाठी तत्पर राहून आदिवासींचे मानव म्हणून, नागरीक म्हणून व्यक्तिगत व सामूहिक हक्क पदरी पाडून घेण्यासाठी गाव पातळीपासून सुरुवात केली पाहिजे. वेळ आलीच तर असहकार, प्रतिकार आणि संघर्ष या तिन्ही मार्गांचा अवलंब करावा लागेल. कोणत्या वेळी कोणता मार्ग स्वीकारावा हे परिस्थितीवर अवलंबून राहील. परंतु प्रबोधन सातत्याने व्हावे, जेणेकरून दिशा चुकवणाऱ्यांना संधी मिळू नये.

* * *

## आदिवासी बोलू लागला

आश्चर्य असे की आदिवासी या शब्दाबद्दलसुद्धा काही लोकांत विचित्र भावना दिसून येते. कारण तो शब्द आमचे धरणीमातेशी नाते दाखवतो. आमच्या या मातीशी असलेल्या संबंधापासून तोडू पाहणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे कोणताही शब्द वापरला तरी या

मातीशी असणारे आमचे नाते इतरांच्या इतरांच्या मर्जीवर अवलंबून नाही.

कोणताही मानवसमूह या ठिकाणी आला त्याआधी आमचे पूर्वज त्या ठिकाणी वस्ती करून होते. आमची स्वतःची संस्कृती, धर्म व परंपरा होती. आमच्यावर सत्ता गाजवून वाताहत लावली. तरीसुद्धा आमच्या मार्गदर्शक शक्तीमुळे आम्ही स्वतःला विसरू शकलो नाही व दबाव व तणाव मध्ये असता आमच्या पद्धतीने जीवनातील आनंद उपभोगत राहिलो.

निसर्गातून जे मिळण्याजोगे होते त्यावर आम्ही समाधान मानले व भविष्याची फारशी चिंता केली नाही. निसर्गापासून आम्ही शिकलो. निसर्ग आमच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनले. आमचे अस्तित्व निसर्गाने दिलेल्या उपजीविकेच्या साधनांमुळे आहे, म्हणून आम्ही निसर्गाची आदराने पूजा करू लागलो. पण आम्हाला परिचित नसलेल्या पद्धती आमच्यावर लादण्याचा प्रयत्न झाला, त्यावेळी आम्ही बेचैन झालो.

इतरांकडून आम्हाला जी वागणूक मिळत आली, आमचे निरनिराळ्या पद्धतीने शोषण होत आले, शारीरिक, मानसिक छळ आम्हाला, आमच्या पूर्वजांना सोसावा लागला, त्यामुळे आमच्या घरातच आम्ही परके झालो आहोत असे वाटू लागले. आम्हाला अद्यापही अर्धविकसित मानवप्राणी समजण्यात येते. आजपावेतो आम्हाला फक्त ऐकून घ्यावे लागले आहे. आम्हाला जे व्यक्त करावेसे वाटले ते आम्हाला निमूटपणे गिळावे लागले. आता आमच्या लक्षात येऊ लागले आहे की आमचे म्हणणे ऐकून घ्यायला भाग पाडणे हा आमचाही हक्क आहे. आम्ही माणसे आहोत आणि आमचा भाग्यविधाता बनण्याचा हक्क दुसऱ्या कोणालाही नाही.

आम्ही या देशाचे निसर्गतः नागरीक आहोत. परंतु घटनेच्या 'आम्ही भारतीय लोक' या प्रस्तावनेत आमचा जणू समावेशच नाही असे भासवण्याचा प्रयत्न उघड दिसतो. आमचे ऐतिहासिक योगदान नाकारले गेले आहे. आमचा राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात खऱ्या अर्थाने समावेश झालेला नाही; नव्हे, बुद्धिपुरस्सर आम्हाला वगळण्यात आले असेच आम्हाला वाटते.

आमचे कल्याण व उन्नतीचा खूप गाजावाजा केला जातो व स्वतःबद्दल गैरसमज असलेले लोक आम्हाला मुख्य प्रवाहात सामील होता यावे यासाठी आटापिटा करत असल्याचे भासवतात. परंतु शहरातील मुख्य प्रवाह हा खेड्यातील लोकांच्या जिवावर. न्यूयॉर्क, हाँगकाँग, सिंगापूर, लंडनच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यासाठी ते फार पुढे निघून गेले आहेत. मागे फिरून पाहण्यास त्यांना सवड नाही. त्या प्रवाहाचा निर्माता कोण? त्याचा या देशाच्या वास्तवतेशी संबंध काय? त्याचा आमचे कल्याण किंवा उन्नतीशी कोणत्या प्रकारचा संबंध पोहोचतो? याची उत्तरे शोधण्याची जबाबदारी त्यांची आहे.

जे भारतातील समाजाचे मार्गदर्शक म्हणून पुढे राहिले त्यांनी हा समाज एकसंध राहावा यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न केला असता तर हा समाज आज उभा-आडवा छिन्न-विच्छिन्न झालेला दिसला नसता. तरीसुद्धा आपले अपयश मान्य न करता धूळफेक

करून आपला दर्जा, वर्चस्व, सत्ता टिकवण्यासाठी शोषण, बुद्धिभेद चालू ठेवण्याच्या या प्रयत्नात आम्ही त्यांना साथ देत राहावी अशी अपेक्षा आहे काय ?

आम्हाला लोकशाहीचे धडे देण्याची गरज नाही. सर्वांच्या सहभागाने निर्णय घेण्याची आमची परंपरा आहे. दुसऱ्याच्या कष्टावर आनंद उपभोगणारी आमची संस्कृती नाही. आज निर्णय दिल्लीला घेतला जातो. उपआयुक्तांमार्फत लागू केला जातो. आमचे प्रतिनिधी निर्णयाच्या वेळी हजर असतात व त्यांचा पाठिंबा आहे हे गृहीत धरलेले असते. कारण ते आमचे खरेखुरे प्रतिनिधी नसतात, तर कोणत्या तरी अनाकलनीय विचार असलेल्या, हितसंबंध जपणाऱ्या, राजकीय पक्ष म्हणवणाऱ्यांच्या धूळफेकीला साथी असतात. स्वार्थासाठी त्यांच्या मालकाचा आदेश त्यांना पाळावा लागतो.

आमच्या अस्तित्वाच्या धडपडीत आम्ही तथाकथित सुसंस्कृत लोकांवर विश्वास ठेवला. त्यांनी त्यांच्या फायद्यासाठी मान्य केलेल्या पद्धतीनुसार नीतिनियम, कायदे व संस्था निर्माण करून आमच्यावर लादल्या. परंतु आमच्या परंपरा आम्ही टिकवून ठेवल्या, नव्हे इतरांनाही त्या स्वीकाराव्या लागत आहेत. सामुदायिक नृत्यातील आनंद उपभोगण्याची आमची पद्धत आता सर्वदूर स्वीकारली जात आहे. आदिवासींना सुधारणाऱ्यांना आता हुंडाबंदीचा प्रचार करावा लागत आहे. आमच्या विवाहपद्धतीला नावे ठेवत त्याचे उदात्तीकरण आता 'प्रेमविवाह' नावाने प्रचलित झाले आहे. आमची विवाह जुळवण्याची पद्धत आता 'वधूवर मेळावे' या नावाने पुढे येत आहे.

असे असता भारत सरकार भारतातील आदिवासी 'आदिम' जमातीत मोडत नाही असे जाहीर करून आम्हाला संयुक्त राष्ट्रसंघाने प्रसिद्ध केलेल्या आदिवासींच्या हक्काच्या जाहीरनाम्यात नमूद केलेल्या हक्कांपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. १२ डिसेंबर १९९२ ते ११ डिसेंबर १९९३ हे आदिवासी वर्ष जगात जाहीर झाले तरी भारतात सरकारी पातळीवर त्याचा गाजावाजा होऊ नये, अशी दक्षता घेण्यात आली आहे. मानवी हक्क कमिशन नेमण्याची घोषणा केली असली तरी आदिवासींना त्यात स्थान कितपत राहील याबाबत शंका वाटते, कारण सरकारचे याबाबतचे जागतिक पातळीवरील धोरण होय. संयुक्त राष्ट्रसंघातील स्थायी शिष्टमंडळाने भारतात आदिवासी शिल्लक नाहीत, असे सांगून १९८८ मध्ये आदिवासींचे अस्तित्व नाकारले आहे आणि पर्यायाने मानवीहक्क कमिशनचा मर्यादित हेतू उघड झाला आहे. २८ सप्टेंबर १९९३ रोजी अध्यादेश काढून जिल्हा पातळीवर खास कोर्ट नेमण्याची तरतूद असली तरी स्वतंत्र निःपक्षपाती यंत्रणा नाही. स्वतंत्र अधिकार व जबाबदारी नाही. तक्रार करण्याची मुदत एक वर्षाच्या वर नाही, विलंब माफ करायची तरतूद नाही. कमिशनला फक्त शिफारस करण्याचा अधिकार आहे व अशासकीय संघटना वगळण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत आजपावेतो घटनेतील देऊ केलेली सुरक्षितता, आर्थिक व शैक्षणिक हितसंबंधांचे संवर्धन, सामाजिक अन्याय व शोषणापासून संरक्षण आमच्या वाट्याला आले नाही. अशा वेळी मानवीहक्क कमिशनबाबत आम्ही काही अपेक्षा करणे भाबडेपणाचे ठरणार आहे. १९९० मध्ये अन्याय, अत्याचार प्रतिबंधक कायदा करावा

लागला हा त्याचा पुरावा आहे. असमानतेमुळे कायद्यापुढे समानता फोल ठरते.

आंतरराष्ट्रीय मजूर संघाने इंडीजिनस पीपल असे शब्द वापरले आहेत आणि अनुसूचित जमातीची व्याख्या करताना ढेबर कमिशनने त्याच वर्गात मोडत असल्याचे नमूद केले आहे. जागतिक बँकेने तोच अर्थ घेतला आहे. दडपलेली मानवता, आत्यंतिक गरिबी, आर्थिक असमता यामुळे मानवीहक्काच्या उल्लंघनाचे बळी तर आहोतच, पण सत्तेसाठी कोणत्याही मानवी मूल्यांना तिलांजली देणाऱ्या व सत्तेचा केवळ स्वार्थासाठी प्रयोग करू पाहणाऱ्या प्रस्थापित वर्चस्ववादी लोकांच्या तत्त्वशून्य, भ्रष्ट व स्वार्थी राजकारणाचे बळी काय म्हणून बनावे, याचा आम्ही विचार करू लागलो, स्वतःची ओळख करून घेऊ लागलो, तर इतरांनी सोयीप्रमाणे शिक्के मारण्याची गरज काय ?

उत्खननात सापडलेली दगडी हत्यारे आर्यांच्या आधीची आहेत, असे इतिहासतज्ज्ञ सांगतात. असे असता पुराणकाळातील वाली, सुग्रीव, नळ, जांबुवंत, हिडिंबा, शबरी, शंबूक, एकलव्य हे आदिवासींचे प्रतिनिधीच होते.

आमची उन्नती व कल्याण हा अलंकारिक भाषेचा प्रकार आहे. निवडणूक काळात होणारी भाषणे, दिली जाणारी आश्वासने म्हणजे 'दानत वजा सदिच्छा' यापलिकडे काहीही नसते.

आज विकासाच्या कत्तलखान्यात आशिया खंडात सर्वदूर आदिवासींना भयानक स्थितीला तोंड द्यावे लागत आहे. रेड इंडियन यांना वास्को-द-गामाच्या वारसांनी गुलाम केले. सद्दाम हुसेन कुर्दिश आदिवासींच्या मुळावर आला, तर बांगला देशातील मीना व चकमा आदिवासींविरुद्ध फौजेचा उपयोग करून शिरकाव केला जातो हा आधुनिक काळातील सुसंस्कृतपणा आहे. याला भारत अपवाद असण्याचे कारण नाही. एकच धर्म असून आदिवासींबाबत मानवताशून्य फरक का केला जातो ?

पिढ्यान् पिढ्या ज्या मानवसमूहाचा गुलामासारखा उपयोग करून घेण्यात आला, त्याला स्वतंत्रपणे विकास करून घेण्याची संधी दिली तर तो पुढे उपयोगी पडणार नाही, म्हणून मतदानाची समानता एवढेच लोकशाही भासवायला पुरेसे आहे. परंतु सामाजिक, आर्थिक लोकशाहीबाबत तज्ज्ञ बोलतात, त्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा होत असल्याचे आढळत नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही लोकशाहीची तत्त्वे सांगितली जातात, परंतु सर्वांना स्वातंत्र्याचा अनुभव का येऊ नये ? समता व बंधुभाव म्हणजे ममता. ममता नाही तेथे समता नाही. समता नाही तेथे एकता कशी असू शकते ? एकतेचा आग्रह धरण्याआधी समतेचा आग्रह का धरला जात नाही ?

काळाच्या ओघात हे शाबीत झाले आहे की मानसिक व सांस्कृतिक वर्चस्व पशुतुल्य गुलामगिरीकडे नेऊ शकते. स्वातंत्र्य मिळवावे लागते. स्वातंत्र्याचे दान दिले असे ऐकिवात नाही. जीवदान दिले, जीवदान दिले असे ऐकिवात आहे. गरजेपासून स्वातंत्र्य व शारीरिक, मानसिक, सांस्कृतिक शोषणापासून मुक्ती हे महत्त्वाचे मानवीहक्क वाटतात. तत्त्वज्ञानाचा उपयोग आपली पकड घट्ट करण्यासाठी होऊ शकतो.

कालांतराने तत्त्वात बदल झालेला आढळतो. तोसुद्धा सोयीसाठीच. राष्ट्राला दिशा देण्याचा, इतर सर्वांना वगळून हक्क सांगणाऱ्यांना इतरांवर वर्चस्व गाजवण्याचा हक्क आहे असे कोणालाही म्हणता येणार नाही. तसेच, आम्ही जे म्हणतो ते मान्य करा अन्यथा नष्ट व्हाल, अशी प्रवृत्ती चालणार नाही. सर्वांचे अश्रू पुसण्यासाठी स्वराज्याच्या आशा-आकांक्षा उराशी बाळगून जनता सामील झाली तर त्याची परिणती ज्यांना हजारो वर्षे अश्रू माहीत नव्हते त्यांना अश्रूंचे पूर पाहणे भाग पडावे अशी व्हावी का? परकीय वसाहतवादाविरुद्ध लढा पुकारणाऱ्या व स्वातंत्र्यासाठी बलिदान करणाऱ्या या समाजाने स्वतंत्र देशात राहून, उपभोगवादी, बाजारू संस्कृतीच्या दडपणाखाली देशी वसाहतवादाचे बळी म्हणून आधुनिक गुलामगिरी स्वीकारावी काय? सत्तेसाठी वापरण्यात येणाऱ्या तत्त्वज्ञानाचा उपयोग निहित स्वार्थासाठी होत आला आहे हे इतिहासाने दाखवून दिले आहे. "भारतातील आदिवासी आदिम जमातीत मोडत नाहीत" असे म्हणून सत्ताधाऱ्यांना सोयीस्कर असे वेगवेगळे शिक्के मारून एखाद्या मानवसमूहाला आपल्या मर्जीप्रमाणे जीवन जगायला भाग पाडण्याच्या परंपरेचा परिचय दिला आहे.

आमचा विकास हा आमचा नैसर्गिक हक्क आहे. जागतिक मानवी हक्क कमिशनने विकासाच्या हक्काला मूलभूत मानवी हक्क म्हणून मान्यता दिली आहे. त्याचा खऱ्या अर्थाने अनुभव आल्याशिवाय इतर मानवी हक्क उपभोगता येणे अशक्य आहे. हा व्यक्तिगत व सामुदायिक हक्क आहे. आंतरराष्ट्रीय कायदेपंडितांच्या कमिशनने विकासाच्या हक्कातील घटक ठरताना—

(१) मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी समान वेतनावर आधारलेली प्रत्यक्ष साधने, पुरेसे अन्न, आरोग्य, निवास, स्वच्छ हवा-पाणी व उत्पादक शक्तिसाधने.

(२) उत्पादक साधनांचा योग्य उपयोग करता यावा यासाठी व विकासाच्या प्रक्रियेत मुक्तपणे सहभागी होता यावे यासाठी शिक्षण व माहिती.

(३) वरील साधनांच्या समान वाटपाची हमी देणारे सरकार व उत्पादक रचना.

(४) सहभागी होण्यासाठी, योग्य-अयोग्य ठरवण्यासाठी, त्यांचे पुनरावलोकन व मूल्यमापन करण्यासाठी, तसेच (विकासाच्या कार्यक्रमांतर्गत प्रक्रियेत) त्यांची अंमलबजावणी करणाऱ्यांना जबाबदार धरण्यासाठी त्यांना संघटित होण्यासाठी सवलत व सेवेची उपलब्धता या गोष्टी मूलभूत मानवी वैभवासाठी आवश्यक ठरवल्या आहेत. यापैकी कोणत्याही गोष्टी आमच्या वाट्याला खऱ्या अर्थाने आल्या नाहीत, तरी आमच्या विकासाचे नगारे वाजवले जातात. अशा वेळी या देशात विकासाची व्याख्या जगावेगळी असावी काय? आमचा कोणत्याही प्रकारे सहभाग नसता आमचा विकास झाला म्हणणे ही फसवणूक नव्हे काय? याला इतर सर्वांची संमती असल्याचे गृहीत धरावे काय? कारण लादलेला विकास हा निसर्गावर, कमकुवत घटकावर, पावित्र्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा एक धूर्त प्रयत्न आहे.

जगातील आदिवासी आता बोलू लागले आहेत व मानवी हक्क संघटनांनी

जुलूम, दडपण, छळाखाली दडपल्या गेलेल्या मानवसमूहाचा अग्रक्रमाने विचार केला आहे. या देशात असा समूह अस्तित्वात नाही असे भासवण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर व त्याकडे डोळेझाक करणाऱ्यावर आम्ही विश्वास ठेवावा काय ?

आजपर्यंत सर्व निमूटपणे सहन करणारा हा समाज जगातील आदिवासींचा आवाज ऐकत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने प्रसिद्ध केलेल्या आदिवासींच्या हक्काचा जाहीरनामा व आदिवासी वर्ष याबाबतची सरकारची भूमिका विचारात घेता, आदिवासी मुका प्राणी आहे असा समज झालेल्या, स्वतःबद्दल अनैसर्गिक प्रेम असलेल्यांचा भ्रम दूर करण्यासाठी आदिवासी बोलू लागला आहे.

* * *

## आदिवासी एकता व बहुजन समाज

आदिवासी एकता परिषद ही आदिवासींचे या देशातील अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने देशभर चाललेल्या प्रयत्नाचा एक भाग आहे. आपल्या अस्तित्वाला धोका असल्याची जाणीव झाल्याने तो समाज खडबडून जागा होत आहे. कर्कश आवाज, वागणुकीतील तऱ्हेवाईकपणा, शब्दप्रयोगातील अतिशयोक्ती व सैद्धांतिक अंदाज यांचा तो अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे. आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रथम त्याला स्वतःची चेतनाशक्ती जागवावी लागणार आहे. त्याची आजची स्थिती फार दयनीय असली तरी त्या समाजाने सोसलेली दडपशाही इतरांच्या वाट्याला आली नाही. आपले अस्तित्व टिकून आहे याच्यामुळे आपल्यावर आलेली संकटे आपण दूर करू शकतो, असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला तर नवल नाही.

जगातील मानवी जीवनाला गती मिळाली ती विज्ञाननिष्ठा, बुद्धिनिष्ठा यातून. आणि नवीन मानवीमूल्ये तयार झाली. त्यांच्याकडे मानवसमाज आकर्षित झाला व ती प्रत्यक्षात आणण्यासाठी तो धडपड करू लागला. ज्या विचारसरणीच्या प्रभावाने त्याला मानसिक गुलामगिरी पत्करावी लागली त्याबद्दलच्या जाणिवेने, तो अस्वस्थ झाला आणि बौद्धिक वर्चस्वातून साधनसंपत्तीच्या जोरावर लादलेले शोषण, दडपण झुगारून देण्यासाठी तो संघटित होऊ लागला. मानवतावादी दृष्टिकोणामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मानवी जीवनमूल्ये त्याला महत्त्वाची वाटू लागली. याला भारत अपवाद राहू शकत नाही.

आदिवासी समाजाने आपापल्या क्षेत्रात परंपरागत स्वातंत्र्याचा उपभोग घेत असता आपली जीवनपद्धती व संस्कृती आजतागायत टिकवून ठेवली. इतरांचा संपर्क नव्हता तोपर्यंत शोषणाचा, संघर्षाचा प्रश्न नव्हता. परंतु विस्तारवादी व वर्चस्ववादी समुदायाने मानवी शोषणाला सुरुवात केली त्याचे मूळ प्राचीन भारताच्या साहित्यात आढळते. देवाचा राजा इंद्र हा सर्वांचा स्वामी होता. बाकी सर्व दास गणले जात. या दासप्रथेत शोषणाला समर्थन मिळाले आहे ते समाजधारणेच्या नावाखाली ! आपण इंग्रजांचे गुलाम होतो याबद्दल आपल्याला खंत वाटते, चीड येते. प्राचीन साहित्यात दास, भृत्य,

किंकर, परिचारक असे शब्द आढळतात, त्यांचा अर्थ गुलाम असाच आहे. पाश्चिमात्य देशांतही गुलाम-प्रथा होती. त्या ठिकाणी बंडे झाली. भारतात ती झाली नाहीत याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. शोषक वर्गाने समाजधारणेसाठी जी विचारप्रणाली निर्माण केली ती त्यांच्या हितासाठीच होती, परंतु इतरांना हितावह वाटावी अशीच मांडली. श्रद्धेला महत्त्व दिले, परंतु श्रद्धेला उपजीविकेचे साधन म्हणून उपयोगात आणले. मनुस्मृती, नारदस्मृती, शुक्र आचार्य, चाणक्य दासप्रथेचें आणि पर्यायाने शोषणाचे समर्थन करतात आणि श्रमविभागणी म्हणून चातुर्वर्ण्याचे गोडवे गायले जातात. परंतु नंतर एकच वर्ण श्रेष्ठ ठरवून इतर तीन वर्ण शूद्रात जमा केले गेले. नंतर वर्णव्यवस्था बंदिस्त होऊन जन्मावरून जाती ठरवण्यात येऊ लागल्या. त्यांनी एकत्र येऊ नये म्हणून पुन्हा विभागणी करून संपूर्ण समाजाची उभी-आडवी शकले पाडली. त्यात कारागीर, बलुतेदार तर होतेच, परंतु शेतकरी, मजूर आणि इतर सर्व दलित यांची शूद्रात गणना होत होती. आदिवासी समाज चातुर्वर्ण्याच्या चौकटीत बसला नाही तरी तथाकथित बुद्धिवादी मंडळी आदिवासींना जात चिकटवण्याचा प्रयत्न करतातच.

अशा परिस्थितीत बहुजन समाजाचा विचार आदिवासींनी करण्यापेक्षा बहुजन समाजाने आदिवासींचा विचार करणे योग्य ठरणार आहे. आदिवासी समाजासाठी घटनेत तरतुदी आहेत, परंतु या समाजाचे शोषणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनाची असताना शोषण तर थांबले नाहीच, उलट शोषणाचा वेग वाढला. आदिवासींचे मूलभूत मानवी हक्क पदोपदी तुडवले जाऊ लागले. त्यांचे परंपरागत वहिवाट हक्क नाकारून त्यांना उपरे, अतिक्रमण करणारे ठरवले जात आहे. त्यांच्या जीवन जगण्याच्या साधनांपासून त्यांना वंचित केले जात आहे. त्यांची जीवनपद्धती, संस्कृती नष्ट केली जात आहे आणि हे सर्व लोकशाहीच्या नावाखाली होत आहे जागतिक पातळीवर सरकारतर्फे आदिवासींचे अस्तित्व नाकारले जात असता आदिवासी आपल्या अस्तित्वाच्या संघर्षात अडकला आहे. तरीसुद्धा मानवतावादी मुक्तीलक्ष्यापासून त्याला अलिप्त राहता येणार नाही. परंतु त्यासाठी शोषण, जुलूम, दारिद्र्य व दडपशाही याविरुद्ध ठामपणे उभे राहण्यासाठी वैचारिक जागृती व मानसिक धैर्य बाळगण्याची आणि मानसिक गुलामगिरी टिकवणाऱ्या विचारसरणीपासून फारकत घेण्याची तयारी आवश्यक आहे. पिढ्यान् पिढ्या शोषित, वंचित, उपेक्षित आदिवासी समाज आता कुठे बुद्धिभेद, दिशाभूल ओळखू लागला आहे. ज्याला बहुजन समाज म्हणता येईल असा चातुर्वर्ण्याच्या चौकटीतील विषमतेची सवय झालेला समाज समतेचा विचार करू लागला तर आधुनिक युगात ती फार मोठी घटना ठरणार आहे.

आज जी जीवनमूल्ये पुढे आली ती जुन्या व नव्या मूल्यांच्या संघर्षातूनच! राजेशाही संपली, लोकशाही सर्वसामान्य झाली. पण लोकशाहीची जोपासना व विकास यांच्या आड येणाऱ्या शक्ती या लोकशाहीचा गैरफायदा घेऊन वाढत असतात. आज सर्वदूर भ्रष्टाचार वाढला आहे. गुन्हेगार व राज्यकर्ते यांतील फरक दिसेनासा झाला आहे. संघटना, संस्था बळकावून, राजकीय पक्षातील सत्तास्पर्धेचा अंदाज घेऊन सत्ता,

संस्कृतीशी, जीवनपद्धतीशी शिक्षणाचा संबंध असावा, त्याशिवाय शिक्षणाचा त्यांच्या विकासाच्या दृष्टीने उपयोग होईलच असे म्हणता येणार नाही. शिक्षणाबाबतचा दृष्टिकोण आणि निकष याबाबत एकमत होणे कठीण आहे. मात्र त्याचा परिणाम उशिरा जाणवतो, याबबत मतभेद होण्याचे कारण नाही. निरक्षरतेमुळे विकास योजनांपासून आदिवासी वंचित राहिला, असे आदिवासी मेळावे भरवून सांगितले जाते. परंतु आदिवासींनी शिक्षण घेऊन आपला विकास करून घ्यावा अशी संधी, संरक्षण त्यांना खऱ्या अर्थाने उपलब्ध होते का, असा प्रश्न उपस्थित होतो.

या समाजाच्या शिक्षणाबाबत विचार करता, पुराणकाळात जाण्याची गरज नाही. तरी पुराणकाळापासून आदिवासी समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला आहे असे म्हणता येणार नाही. वर्चस्ववादी समाजाने आदिवासींना असंस्कृत ठरवून स्वतःच्या दृष्टीने सोयीस्कर व उपयोगी मानवप्राणी म्हणून पाहिले आहे. अशा स्थितीत आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढावे असे कोण ठरवणार?

आदिवासी समाजाची स्वतःची संस्कृती आहे, जीवनपद्धती आहे, भाषा आहे, कला आहे व परंपरागत स्वातंत्र्याचा उपभोग घेत असता आपल्या विकासाची क्षमता या समाजात आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आजही लिंबारामसारखा तिरंदाज व यापूर्वीदेखील जयपालसिंगसारखा क्रिकेटपटू आपले कर्तृत्व दाखवू शकतात. असे असताना शिक्षणक्षेत्रात या समाजाचे स्थान एवढे खाली का असावे, याचे कारण शोधून काढणे हे आदिवासी विचारवंतांचे काम आहे. इतरांना त्यासाठी बुद्धी खर्च करण्याची गरज नाही. कारणाचा शोध आदिवासींच्या दृष्टिकोणातून घ्यावयाचा आहे. इतरांच्या दृष्टीने इतर कारणे असू शकतील, तीही विचारात घेणे जरूर आहे. सरकारी आकडेवारीवरून पुरुषात १६.३५ व स्त्रियांत ८.०५ शेकडा प्रमाण शिक्षणाचे आहे. नोकरभरतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी खास जाहिराती दिल्या जातात, परिपत्रके निघतात. परंतु शैक्षणिक पात्रतेअभावी अनुशेष भरला जात नाही. तर हा सत्ताधाऱ्यांनी व समाजधुरिणांनी बाळगलेल्या सदिच्छा वजा दानतीचा परिणाम आहे असे म्हणणे भाग पडते. आदिवासी क्षेत्रात काम करण्यास एखाद्या सरकारी कर्मचाऱ्यास पाठवणे म्हणजे शिक्षा देणे असे मानले जाते व त्या त्या भागातील शाळादप्तर तालुक्याच्या ठिकाणी असल्याचे वर्तमानपत्रांतून वाचायला मिळते.

आदिवासी वस्ती असलेला भूभाग भाषावार प्रांतरचनेच्या नावाखाली विभागून वेगवेगळ्या प्रांतांत वाटून घेतला. आदिवासींच्या प्रचलित भाषा, प्रथा यांचे संशोधन करून ऐतिहासिक सत्यशोधन करण्यात त्याचा उपयोग करण्याऐवजी त्या त्या प्रांतातील ठराविक लोकांची, ठराविक क्षेत्रात अस्सल गणली गेलेली भाषा लादण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्थानिक वातावरणात एकाच प्रांतातसुद्धा उच्चार, शब्दप्रयोग यात फरक असतो. मग आदिवासी मुलांना शिकवण्यात येते ती अस्सल भाषा असते असे म्हणणे धाडसाचे ठरावे, असे वातावरण आहे.

शिवाय आदिवासी व बिगर आदिवासी असे विभाग पाडून पक्षीय दृष्टीने

सोयीस्कर ठरणाऱ्या भागातील आदिवासींना सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी त्या विभागाबाहेर राहणाऱ्या आदिवासींना सर्व योजनांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. बहुसंख्य मजूर असलेले आदिवासी मुलाबाळांना घेऊन ऊसतोड, वीटभट्टी, दगडखाण या कामासाठी परप्रांतात जातात व सात-आठ महिने राहून परत येतात. त्यांचा आणि शिक्षणाचा संबंध येत नाही व त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहतात. तीन हजार मुलांसाठी एक आश्रमशाळा देण्याची घोषणा करण्यात येते. परंतु त्यामागे आदिवासींऐवजी राजकीय दलाल, नातेवाईक यांची सोय लोकप्रतिनिधींना बघावी लागते. तो एक राजकीय दृष्टीने उपयुक्त उद्योग म्हणून पाहिला जातो. यातच आदिवासींच्या शिक्षणाची आबाळ करता येते. मात्र स्वतः आदिवासी सामाजिक बांधिलकीतून एकत्र येऊन बौद्धिक विकासाचा प्रयत्न करतात त्यांना सहकार्य तर सोडाच, सर्व प्रकारे त्यांची अडवणूक करण्यात येते. आपण आदिवासींवर फार मोठा उपकार करत आहोत असे भासवले जाते. शासकीय आश्रमशाळेतून शिकलेल्या मुलांपैकी किती उच्च शिक्षणापावेतो पोहोचले याचा विचार न केलेला बरा.

म्हणून केवळ शासकीय घोषणांवर व सत्ताधाऱ्यांच्या मेहेरबानीवर आदिवासींचा भविष्यात विकास होईल असे म्हणून चालणार नाही. एखादी भाषा सक्तीने लादण्याचा प्रयत्न झाला तर त्यावर चर्चा होऊ शकते. गुणवत्ता डावलण्यासाठी सक्ती केली जाते असाही मुद्दा पुढे येतो, तर आदिवासींच्या संस्कृतीशी, जीवनपद्धतीशी कोणताही संबंध नसता लादलेल्या शिक्षणपद्धतीमुळे आदिवासींच्या भाषा नष्ट होत चालल्या आहेत. आणि हा एक प्रकारे समता डावलण्याचा आणि विषमता चालू ठेवण्याचा प्रयत्न म्हणावा लागेल. यातून आदिवासी विकासापासून वंचित राहणार नाही, याची खात्री कशी पटणार?

आदिवासी व शिक्षण हा तसा वेगळा विचार करता येण्यासारखा नाही. आदिवासींबाबत जगभर वैचारिक मंथन होत असता भारतात मात्र वेगळ्या पद्धतीने पाहिले जाते. आदिवासीस एखादा अविकसित प्राणी समजून वळण देण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षण हे त्यादृष्टीने प्रभावी साधन असले तरी आदिवासींवर त्याचा त्याच्या इच्छेविरुद्ध प्रभाव पडेल असे मानता येणार नाही. घटनेत नमूद केलेले संरक्षण आदिवासींच्या वाट्याला आले नाही. १४ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी मोफत शिक्षणाचे तत्त्व कागदोपत्री धूळ खात पडले असता यात आदिवासींना अग्रक्रम मिळणे शक्य नाही.

म्हणून आदिवासींना शिक्षणाबाबत स्वतंत्रपणे विचार करावा लागणार आहे. त्याचबरोबर जगात जमवून घेण्यासाठी, अस्तित्व टिकवण्यासाठी शिक्षणात आपली भाषा, संस्कृती, इतिहास, कला, संगीत यांचा समावेश असावा असे आदिवासींना वाटतू लागले आहे. कोणत्याही दृष्टिकोणातून शिक्षणाचे धोरण ठरवण्यात आले तरी साक्षर करून आदिवासींना विकासयोजनेचा फायदा मिळवून दिला जाईल ही धूळफेक आहे. शोषित, वंचित, उपेक्षित ठेवून विकासाची स्वप्ने आता आदिवासींना भुरळ घालू

शकणार नाहीत. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण, त्यांना दिली जात असलेली विषमतेची वागणूक यात बदल झाल्याशिवाय आदिवासींच्या शैक्षणिकच काय, कोणत्याही विकासाच्या योजना व घोषणा फोल आहेत.

शिक्षण म्हणजे वर्चस्ववादी उच्चभ्रू लोकांनी ठराविक उद्देशाने तयार केलेला साचा नव्हे की ज्यात आदिवासींना निर्जीव वस्तूप्रमाणे ओतून पाहिजे तसा आकार देता येईल. वर्चस्व व विषमतावादी शैक्षणिक वातावरणात आदिवासींच्या स्वाभिमान, क्षमता, सामुदायिकता व सह-अस्तित्वाच्या कल्पनेला चालना मिळणार नाही.

'Education is the manifestation of perfection already in Man.' शिक्षण म्हणजे माणसात असलेल्या उपजत पूर्णत्वाची अभिव्यक्ती असे स्वामी विवेकानंद म्हणतात. एवढेच नव्हे तर मानवात असलेल्या ज्ञानज्योतीचा प्रकाश बाहेर यावा यासाठी परंपरागत बुरसटलेल्या कल्पनांची ज्ञानपटलावर साचलेली पुटे दूर करण्याचा प्रयत्न करणे याला शिक्षण म्हटले आहे. असा प्रयत्न, असा अनुभव शासकीय योजनांतून अपेक्षिणे शक्य नाही. शिक्षणक्षेत्रात शिरलेले बाजारीकरण आदिवासींना विकासाच्या मार्गावर नेण्यास उपयोगी पडेल असा भ्रम बाळगण्याचे कारण नाही.

आदिवासींनी निसर्गसान्निध्यात राहून निसर्गातील पर्यावरण, जीवसृष्टी, वनस्पतीचे निरीक्षण केले. त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम जाणून घेतला. तसेच त्यांचे उपयोग ते अनुभवाने शिकले, ज्याचे ज्ञान विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांनाही नसते. आदिवासींना 'अशिक्षित' म्हणून त्यांना माहिती असलेले वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, प्राणिशास्त्र कोणत्या कारणाने कमी ठरवता येईल ? भारतातील डॉक्टर्स उच्च वैद्यकीय व्यवसायासाठी अमेरिकेत गेल्यावर तेथील रेड इंडियन आदिवासींकडून ॲक्युप्रेशर थेरपी शिकून भारतात प्रचार करतात. भारतात वनस्पतींच्या जोरावर आपल्या पद्धतीने असाध्य रोग दुरुस्त करणारे आदिवासी आहेत. त्यांच्याजवळ डिग्री नाही म्हणून त्यांचे वैद्यकविषयक ज्ञान टाकाऊ आहे असे म्हणू शकतो का ?

असे जर विचारात घेतले तर आतापावेतो आदिवासीसंबंधात त्यांची भाषा, पर्यावरणाशी जमवून घेण्याची पद्धत, त्यांच्याजवळ असलेले अनुभव, त्यांची सामुदायिकता, सह-अस्तित्वाच्या कल्पना, याबाबतचे विषय कोणत्याही अभ्यासक्रमात विचारात घेण्यात का आले नाहीत ? डॉ. कोसंबी यांनी 'पुराणकथा व वास्तवता' हा मौलिक ग्रंथ लिहून आदिवासी प्रथांचा उपयोग रामायण-महाभारतातील सांस्कृतिक वैशिष्ट्ये उलगडण्यासाठी केला आहे. आदिवासींच्या रूढी व परंपरांच्या अभ्यासाने आदिम भारतातील संघर्षाचा सिद्धांत पुढे आला आहे. पारंपरिक आदिवासी गीतांवरून अभिजात संगीत निर्माण झाले. भारतीय संस्कृतीला त्यांच्यापासून मिळालेले योगदान कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष करता येणारे नाही. याबाबत आदिवासी समाजात होत असलेली जागृती शिक्षणातील अनास्था दूर करण्यासाठी आदिवासींना प्रवृत्त करत आहे. शिक्षणात झालेली आबाळ ही इतरांवर आपल्या भविष्याचा विचार सोपवल्याने

झाली आहे. यापुढे आपल्या भविष्याबाबत दाखवलेली प्रलोभने किंवा आश्वासने कामाची नाहीत, तर या समाजातील अभ्यासू, समंजस, समर्पित कार्यकर्त्यांना एकत्र येऊन निश्चयपूर्वक, दीर्घ मुदतीच्या योजना विचारात घेऊन प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

साक्षरता मोहीम आणि शिक्षणाची आस्था या दोनही गोष्टी म्हणजे लांब राहणारे शेजारी आहेत. आदिवासी साक्षर झाल्याबरोबर विकासाचा फायदा पदरात पाडून घेण्याची संधी त्यांना मिळेल असे समजण्याचे कारण नाही. साक्षर तर झालेच पाहिजे, परंतु आपले शोषण कसे होत आले, आपल्यावर अन्याय का व कोणाकडून होतात, आपले हक्क कोणते, आपल्याला न्यायापासून वंचित ठेवण्याची क्षेत्रे व शक्ती कोणत्या, या सर्व बाबतीत माहिती व्हावी यासाठी शिक्षणाला पर्याय नाही. ते कोणत्या भाषेतून मिळेल, हा प्रश्न महत्त्वाचा नाही, तर आदिवासींना आपली संवेदनशीलता, निरीक्षण, अभिव्यक्ती व कल्पना यांचा इतरांना परिचय देण्यासाठी, शिक्षणक्षेत्रातसुद्धा कोणत्याही प्रकारे अपुरे पडणार नाहीत यादृष्टीने, स्वतःच्या मार्गदर्शक शक्तीवर विसंबले पाहिजे तरच भविष्य घडवायला कोणतीही दुष्टशक्ती आड येण्याचे धाडस करणार नाही.

* * *

## आदिवासी व त्यांचा अलिखित धर्म

आदिवासींबाबत धर्माचा विचार करणारे अशा प्रकारे समजतात की आदिवासींना स्वतःचा असा कोणताही धर्म नाही व या समाजाच्या व्यक्तीला अडचणीचा किंवा अज्ञानाचा गैरफायदा घेऊन शिक्षा देता येऊ शकते. आणि हा समज कट्टर धर्मवाद्यांचासुद्धा असल्याने ते तसा प्रयत्न करत असतात. परंतु धर्माची व्याख्या करताना एकमत कोठेही आढळत नाही. शिवाय धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोणसुद्धा एक नसतो. आदिवासी समाज जगभर आहे. त्या त्या ठिकाणी जमवून घेण्याचा प्रयत्न आदिवासींनी केला. परंतु कोणतेही लेबल लावले तरी आदिवासींना आलेला अनुभव आणि धर्माबाबत होत असलेला प्रचार, त्यामागील हेतू आदिवासींना समजणे कठीण आहे.

जगात अनेक धर्म, पंथ आणि त्यांना आधार म्हणून ग्रंथ, पुराणे आहेत. स्थानिक परिस्थितीत जगत असता आलेल्या अनुभवातून, सुचलेल्या कल्पनांतून मानवने स्वतःला धीर देण्यासाठी काही नियम ठरवले, काही बंधने घालून घेतली व मानवी जीवन सुखी व्हावे असा प्रयत्न केला. त्यानुसार अंगवळणी पडलेली वागणूक हा आचरणाचा भाग झाला. त्या त्या ठिकाणी अनाकलनीय शक्तीच्या अनुभवामुळे मानवाला भीती पण वाटली आणि मानवी जीवन जगण्यात त्याची मदत पण झाली.

त्यामुळे अनाकलनीय शक्तीबद्दल भीती व आदर या दोन्ही भावना रुजल्या. त्याचबरोबर मानवाने आपसात एकमेकांशी कसे वागावे याचाही विचार झाला व सर्वांना सोयीचे नियम झाले. त्याचप्रमाणे मानवी गरजेनुसार व स्वभावानुसार

अनाकलनीय शक्तीस खूष करण्यासाठी काही नियम, विनवण्या, गाणे, प्रार्थना, नैवेद्य, पूजा-प्रतीके आणि अभिवादनाचे प्रकार ठरवण्यात आले. आणि त्याबरोबर कर्मकांड, सण, प्रथा, रीतीरिवाज यांचाही त्यात समावेश झाला. येथपावेतो आदिवासी व इतर धर्मवादी यांत फारसा फरक असण्याचे कारण नाही.

परंतु माणूस अनुभवाने विचारशक्तीचा विकास करून घेत असता त्याच्या ज्ञानात वाढ झाली आणि साधने उपलब्ध करता आली. इतर मानवसमूहाच्या सान्निध्यात आल्याने त्याला इतरांची जीवनपद्धती, प्रथा, नीती, रीतीरिवाज वेगळी वाटली व आपल्याप्रमाणे इतरांचेही सर्व काही असावे असे वाटून त्यांच्यावर आपली पद्धत लादण्याचा प्रयत्न केला. इतर मानव आहेत, त्यांचे अनुभव वेगळे आहेत असे मानायला तो तयार नव्हता. त्यातून भेद, वर्चस्व लादण्यासाठी संघर्ष झाले. त्यात ज्यांनी नेतृत्व केले ते सत्ताधारी झाल्यावर त्यांचे वागणे हा धर्म म्हणून पाळण्यात येऊ लागला. त्यातून कर्मकांड व प्रतीके पुढे आल्यावर भावनात्मक ऐक्य साधण्यासाठी त्यांचा उपयोग होऊ लागला. त्यातूनच धर्माधर्मात युद्धे झाली व आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न झाले.

आदिवासी समाज मात्र या गोष्टीला अपवाद राहिला. धर्माच्या नावाने आदिवासी समाजाने जगात कोठेही अशा प्रकारे प्रयत्न केला नाही. निसर्गाची अनाकलनीय शक्ती व स्वरूप व निसर्गापासून मिळणारी उपजीविकेची साधने यामुळे आदिवासीला आश्चर्ययुक्त भीती व आदर वाटणे साहजिक होते. परंतु जंगली प्राणीसुद्धा जथ्याने राहत असता आपापल्या जथ्यात ते एकमेकांवर वर्चस्व गाजवत नाहीत, हे त्याने पाहिले. निसर्गातील जीवसृष्टी व पर्यावरण यातून तो समन्वय, सह-अस्तित्व, सामुदायिकता व समता शिकला. ते त्याच्या अंगवळणी पडले. तो त्याचा धर्म बनला. वर्चस्ववाद, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भाव आदिवासी समाजात नाही. जंगली प्राण्यांचा स्वभाव व सततचा त्यांचा संपर्क यामुळे संघर्ष नको म्हणून वाघबाबा, नागबाबा यांचीही तो पूजा करू लागला. पूर्वजांबद्दल आदर करणे, पूर्वजांविषयी श्रद्धा जपणे या सर्व गोष्टी आदिवासी धर्माची वैशिष्ट्ये आहेत आणि त्याप्रमाणे आचरण करणे यालाच आदिवासी 'धर्म' मानतात. पक्षी, प्राणी यांच्या आवाजाचा समन्वय साधून, नद्या-पर्वत-झाडे-वेली यांच्याशी नाते जोडून निसर्गाची पूजा व अभिवादन यासाठी आदिवासींचे सण असतात. आनंद उपभोगायचा तो एकट्याने नव्हे, तर समुदायाने. आदिवासींचा धर्म त्यांच्या आचरणात असतो. शब्द पाळणे याला आदिवासी धर्म समजतो. इतरांच्या श्रद्धा पायदळी तुडवणाऱ्या गोऱ्या साहेबाला धडा शिकवल्याची गोष्ट आदिवासी सांगतात. "एक गोरा साहेब एका भिल्ल व एक ब्राह्मण हवालदाराला बरोबर घेऊन शिकारीला जातो. सर्व अर्ध्या चड्डीवर, दोन दिवस फिरून शिकार सापडत नाही. आंघोळ नाही. साहेब चिडलेला. रस्त्यावर डबके दिसते व तुळशीचे झाड दिसते. साहेबाच्या परवानगीने आंघोळ करून ब्राह्मण हवालदार तुळशीच्या झाडाला ओंजळीने पाणी टाकतो. साहेब चिडतो व बुटाने तुळशीचे झाड तुडवतो. भिल्ल हवालदार विचार करतो.

नंतर पुढे त्याला खाजकुयरीचे झाड दिसते. साहेबाला विचारून भिल्ल देवाची पूजा करतो म्हणजे खाजकुयरीची (अंगाला खाज व दाह देणारी वनस्पती) बोंडे तोडून दगडावर ठेवून लांबून नमस्कार करतो. साहेब जास्त चिडतो व बीभत्स शिव्या देत खाजकुयरीचे घड नको तेथे चोळून घेतो. त्याच्या अंगाची लाही होते व भिल्लाचा देव ताबडतोब शिक्षा देतो. तुळशी का तुडवली असे विचारून, सकाळी पंचधातूंनी म्हणजे सर्वांगाला गाईचे शेण रगडून खाजकुयरीचा दाह कमी केला व आंघोळ घालून पंचधातूंचे तीर्थ पाजले अशी ती गोष्ट. आदिवासी तुळशीला पाणी घालत नसेल, पण पूजा केल्यावर साहेबाने तुळशी का तुडवावी? आदिवासींचा धर्म ग्रंथात नाही, तो प्रत्यक्ष आचरणात आहे. मानवतेच्या दृष्टीने हितकारक गोष्टी अनुभवाने आत्मसात करून त्यानुसार आचरण करण्याचा तो प्रयत्न करतो. प्रतीक, कर्मकांड त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे नसते. पुराणात हनुमान आदिवासीचे प्रतिनिधित्व करतो. त्याच्या चित्रावरून आदिवासींच्या धर्माचा बोध होतो. त्याच्या श्रद्धा तो हृदयात पाहतो. ग्रंथातील पुराव्याची त्याला गरज नसते.

आदिवासी धरतीला माता मानतो. शेत पेरताना, कापताना, मळणी करताना तो पूजा करतो. औषधासाठी वनस्पती झाडपाला घेताना अभिवादन केल्याशिवाय तो हात लावत नाही. आपल्या पूर्वजांची श्रद्धा असलेले मोगीमाता, राणीकाजळ, राजापांठा, वेला ठाकूर, इंदिराजा यांना तो पूजतो. इंग्रजांनी आदिवासींचे मानसशास्त्र, वागण्याच्या पद्धती समजून घेतल्या होत्या. इंग्रजांनी आदिवासींच्या संदर्भात लिहिलेली पत्रे सरकारी प्रसिद्धीपत्रकात आहेत. मेजर हसेलवुड खानदेशच्या मॅजिस्ट्रेटला ता. ५ मे १८५८ ला लिहिलेल्या पत्रात म्हणतो, "भिल्ल हे निसर्गतः उदार व मानवतावादी आहेत. त्यांनी स्त्रियांच्या व मुलांच्या रक्ताने कधीही हात माखले नाहीत. क्रूरता व निदर्यता त्यांनी कोठेही दाखवली नाही." हा आदिवासींच्या धर्माचरणाचा भाग आहे. बाह्य देखाव्यापेक्षा प्रत्यक्ष आचरणावर आदिवासींचा धर्म आधारलेला आहे.

पशुपूजक, निसर्गपूजक, फेथलेस क्रिएटर अशा शेलक्या, निवडक शब्दांनी आदिवासींना हिणवणाऱ्या पोथिनिष्ठ धर्मवाद्यांनी त्यांना आपापल्या कळपात ओढण्याचा प्रयत्न केला, परंतु आदिवासींच्या नैसर्गिक वागणुकीत फारसा फरक पडला नाही असा आजवरचा अनुभव आहे. दडपणाने, अडचणीचा गैरफायदा घेऊन किंवा प्रलोभन दाखवून निरनिराळ्या धर्मात सामील झाल्यावरदेखील तो आदिवासी आहे हे विसरू शकत नाहीत. ज्यांच्या धर्मात तो सामील झाला तेथे त्याला मिळालेली वागणूक कोणत्याही धर्मात न बसणारी अशी राहिली आहे. अमेरिकेतील रेड इंडियन, इराकमधील कुर्दिश, बांगला देशातील मीना, चकमा यांची स्थिती पाहता ग्रंथातील धर्माप्रमाणे प्रत्यक्षात आचरण नाही किंवा धर्माचा अर्थ लावण्याचा मक्ता काही ठराविक लोकांकडे असल्याने सर्व मानवजातीसाठी असा एकच धर्म असावा, असेही शक्य नाही, असे आदिवासीला वाटले तर त्याला दोष देता येणार नाही.

आदिवासीला निसर्गाच्या निरीक्षणातून, प्रतिबिंबातून, अनुभवातून, कल्पनेतून

सत्यता, संवेदनशीलता, मानवता, उदारता, समता या गोष्टी आत्मसात करता आल्या. सत्य लपवून फायद्याचा व्यवहार आदिवासीला जमत नाही. अन्याय, अत्याचार, शोषण, दडपण या मानवतेला कमीपणा आणणाऱ्या गोष्टीविरुद्ध धर्मयुद्ध पुकारले जावे असे कोणताही धर्मग्रंथ सांगत नाही. धर्मयुद्धे झाली ती सत्तेसाठी, प्रदेशासाठी, क्षेत्रासाठी. समतेसाठी पुढाकार घेण्यास शिकवणारा धर्मग्रंथ उपलब्ध नाही. आणि असला तरी तो आचरणात आणण्यासाठी असावा असे वाटत नाही किंवा ठराविक लोकांपुरता सीमित असावा. कारण विकासाच्या, परिवर्तनाच्या नावाखाली साधनसंपत्ती, बुद्धिमत्ता, सत्ता यांचा दुरुपयोग होत असता, सभ्यतेच्या सर्व मर्यादांचे उल्लंघन होत असता आदिवासी समाज आपल्या मार्गदर्शक शक्तीला डावलून मानवतेविरुद्ध अनर्थकारक गोष्टीत सामील झाला नसल्याने आदिवासीला धर्म नाही असा गैरसमज होणे शक्य आहे.

आदिवासी 'माणसा'वर विश्वास ठेवतो. व्यवहारात कागदपत्र करून घेण्याची त्याला गरज नसते. मनुष्याने दिलेला शब्द मनुष्य पाळतो अशी त्याची श्रद्धा असते. परंतु त्याच्या श्रद्धेला ठेच पोहोचते, लिखित व्यवहारातसुद्धा शब्दाचे निरनिराळे अर्थ काढले जातात. आदिवासीने त्या त्या ठिकाणी आपल्या पद्धतीने जीवन जगण्याचा प्रयत्न केला व मानवतेच्या कल्पना उराशी बाळगून निरनिराळ्या धर्मांच्या, पंथांच्या लोकांशी सह-अस्तित्व, समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा भ्रमनिरासच झाला आहे व तो पुन्हा आपल्या मूळ निसर्गधर्माकडे वळला आहे. प्रसारमाध्यमातून ध्वनिवर्धकाच्या साहाय्याने शिकवला जाणारा धर्म आपल्यासाठी नाही असे त्याला वाटते. त्याला समाधान एवढेच की सर्व प्रकारच्या शोषणाचा तो बळी असला तरी धार्मिक शोषणाचा तो बळी नाही. शिवाय विज्ञानयुग असले तरी जगाचे लक्ष पर्यावरण व निसर्गनियम, जीवसृष्टी याकडे वेधले जात आहे. निसर्गसाधनांचे जतन व त्यांचा मानवतेसाठी सदुपयोग करणारी व्यक्ती पूजनीय ठरू शकेल असे आदिवासींना वाटते.

लहान मुलांना भीती दाखवण्यासाठी जसा बागुलबुवा असतो, तसे कोणत्या तरी काल्पनिक देवाची भीती दाखवून मानवतेला वेठीस धरणारे व त्याचे समर्थन करणारे कुठलेही धर्मग्रंथ आधारभूत नसल्याने प्रत्यक्ष आचरणाने निसर्गनियमांचे व पर्यायाने मानवधर्माचे पालन आदिवासी करत आला आहे. आणि आदिवासींच्या दृष्टीने प्रकृती हाच परमेश्वर आहे. विज्ञानयुगात धर्माचे नाते चमत्कार किंवा अंध विश्वासाशी नव्हे तर मानवतेच्या दृष्टीने निसर्गाचा उपयोग करण्याशी राहणार आहे.

□□

**ही पुस्तिका उषा वाघ यांनी सुगावा प्रकाशनाकरिता गणेश मुद्रणालय, शनिवार पेठ, पुणे-३० येथे छापून ८६१/१ सदाशिव पेठ, पुणे-३० येथे प्रसिद्ध केली.**
**(फोन : ३२१०२७/४२५२६३)**



## ॲड. माधव बंडू मोरे

जन्म ३१ ऑगस्ट १९३२ वायपूर, ता. शिंदखेडे, जि. धुळे शिक्षण – इयत्ता ६ वी पावेतो. वायपूर १९४५ मध्ये वडील वारले. जंगलातील खुंट काढून कोळसा पाडून विकणे, मोळ्या विकणे हा उद्योग. इ. ७ वी साठी नरडाणे ५ मैल पायी. १९४६ इ. ७ वी पास. पुढे शिक्षणाची सोय झाली नाही म्हणून बकऱ्या – गुरे चारणे, मोल-मजुरी करणे यात ४ वर्षे. मामांचे गाव सुलवाडे, मावशीचे गाव चिलाणे येथे नंतर कामाठी म्हणून शेतकरी बोर्डींग मध्ये राहण्याची जेवणाची सोय झाली, त्याबरोबर ८ वीत नाव दाखल. चार वर्षात एस. एस. सी. पास. १९५४ नंतर संत ज्ञानेश्वर वसतिगृहात प्रवेश. १९५८ बी. ए. वाडिया कॉलेज पुणे. जेवणाच्या त्रासामुळे आरोग्य बिघडले. एक वर्ष हायस्कूल शिक्षक. नंतर पुणे येथे एल. एल. बी. साठी १९६१ ला पानशेत धरणाचा तडाखा. परत गावाकडे पुन्हा शिक्षक. राहिलेल्या विषयांची परीक्षा. नंतर वकिलीला सुरुवात. गोरगरीब आदिवासींना कायद्याची मदत आजपावेतो चालू.

निरनिराळ्या चळवळीतून उपेक्षित, शोषित, वंचित समाजाचे हित लक्षात घेऊन डोळसपणे सहभाग. आदिवासी एकता परिषदेच्या माध्यमातून आदिवासी चळवळीत सहभाग.

क्रांतिवीर ख्वाज्या नाईक विधायक मंडळ ही जागृती, शिक्षण, स्वावलंबन, हक्कसंरक्षण या उद्देशाने चालू केलेली संस्था. आश्रमशाळा. सरकारी अडवणूक. त्यातून मार्ग काढत विधायक कामाला प्रोत्साहन पुण्यात ग. प्र. प्रधान यांनी एल. एल. बी ची परीक्षा फी भरली. भाई वैद्य, आचार्य केळकर, इंदुताई केळकर यांच्याशी सतत संपर्क.